CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २९७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा — 'बेस्ट बँक ऑफ द इयर' व 'बेस्ट व्हिजनरी चेअरमन पुरस्कार प्राप्त

### देवगिरी बँक ठरली बेस्ट बँक

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०२ फेब्रुवारी :** ग्राहककेंद्रित सेवा, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विश्वासार्ह बँकिंगच्या जोरावर देवगिरी बँकेस आयकॉनिक लीडर्स अवॉर्ड तर्फे 'बेस्ट बँक ऑफ द इयर' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

याचबरोबर बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांना ग्राहकांपर्यंत प्रभावी पोहोच, नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासाठी 'बेस्ट व्हिजनरी चेअरमन या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

देवगिरी बँकेच्या वतीने बँकेच्या संचालिका मंगलाताई वाहेगावकर, अमिताताई लेकुरवाळे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर व उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी पुरस्कार स्वीकारले.

ग्राहकांचा विश्वास हेच बँकेचे भांडवल मानून तंत्रज्ञानाधारित सेवा, सुलभ व पारदर्शक व्यवहार, डिजिटल बँकिंग, तसेच सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल या पुरस्कारांच्या माध्यमातून घेण्यात आली आहे.

बँकेचे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या प्रभावी अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांच्या नेतृत्वाखाली बँकेने केवळ आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित न राहता, ग्राहक संवाद, वित्तीय साक्षरता, नव्या योजना व आधुनिक बँकिंग संकल्पनांच्या माध्यमातून बँकिंग क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला आहे.

हे पुरस्कार बँकेच्या संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्या सामूहिक परिश्रमांचे फलित असून, भविष्यातही अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि ग्राहकाभिमुख बँकिंग सेवा देण्यासाठी बँक कटिबद्ध असल्याचे किशोरदादा शितोळे यांनी नमूद केले आहे.




## पुण्यात मेट्रोच्या विस्तारासाठी ५१७ कोटींचा निधी

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०२ फेब्रुवारी :** येत्या मार्च महिन्यात पुणेकरांना एक विशेष भेट मिळणार आहे. पुण्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन लवकरच सुरू होणार असून प्रवासाचा वेळ लक्षणीरित्या कमी होणार आहे. हिंजवडी ते शिवाजी नगरपर्यंत प्रवास करायला सध्या २ तास लागतात. हा वेळ सरळ अर्ध्या तासावर येणार आहे. त्यासोबतच काल जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात पुण्यातील मेट्रो मार्गिकेचा विस्तार करण्यासाठी ५१७ कोटींचा निधी देण्याची घोषणा केली गेली आहे.



मार्चमध्ये सुरू होणाऱ्या नव्या मेट्रो आणि या विस्तारामुळे येत्या काही वर्षांत पुणेकरांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोच्या चाचणी फेऱ्या यशस्वीपणे पूर्ण झाल्या आहेत. डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली या चाचण्या पूर्ण झाल्या असून मार्चच्या उद्घाटनासाठी सज्ज झाली आहे.

### सुनेत्रा पवारांचा कराड दौरा ठरला नि:शब्द

**तभा वृत्तसेवा**

**सातारा, दि. ०२ फेब्रुवारी :** महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शनिवारी शपथ घेतल्यानंतर तिसऱ्याच दिवशी (सोमवारी) सुनेत्रा पवार कराड दौऱ्यावर आल्या. दिवंगत अजितदादांसारखाच वक्तशीरपणा त्यांच्यात यावेळी पाहायला मिळाला. ज्येष्ठ नेते दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळी त्यांनी अभिवादन केलं.

परंतु, माध्यमांशी संवाद साधणे कटाक्षाने टाळले. त्यामुळे सुनेत्रा पवार यांचा पहिलाच दौरा नि:शब्द ठरला.सोमवारी सकाळी साडे नऊ वाजता त्या कराडमध्ये दाखल झाल्या. शासकीय विश्रामगृहात अर्धा तास थांबून बरोबर १० वाजता त्या प्रीतिसंगमावर पोहोचल्या.

### निराला बाजारात फिल्मी स्टाईल राडा! सिगारेट आणि ५ हजारांसाठी पान टपरीचालकावर पिस्तुल रोखली

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०२ फेब्रुवारी :** संभाजीनगरातून एक फिल्मी स्टाईल घडामोड समोर येते आहे. हा स्टोरी ऐकून तुम्हाला एखाद्या चित्रपटाची स्टोरी वाटेल. पण तसं नाही आहे. हि घडामोड अगदी खरी आहे. खऱ्या जीवनातील आहे. शहरातील गजबजलेला भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निराला बाजार परिसरात एका पान टपरीचालकाला पिस्टल आणि चाकूचा धाक दाखवून लुटल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सिगारेट आणि ५ हजार रुपयांच्या मागणीवरून सुरू झालेला हा वाद थेट प्राणघातक धमकी आणि लुटीपर्यंत पोहोचला. याप्रकरणी क्रांतीचौक पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



साहील चांडक, करण गणेश तांदळे रा. दगडगल्ली, औरंगपुरा,जय भांडारकर, रितेश पहाडिया असे आरोपींचे नाव आहे.या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,निराला बाजारमधील अशोका रेस्टॉरंटच्या शेजारी आशिष रामेश्वर काष्टे यांची 'जय भवानी पान सेंटर' नावाची टपरी आहे. १ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास काही तरुण दुचाकीवरून तिथे आले.आरोपी साहील चांडक याने फिर्यादीला धमकावत, करणला ५ हजार रुपये आणि सिगारेट दे, असे सांगितले. मात्र, टपरीचालकाने पैसे देण्यास नकार दिला आणि वादाला तोंड फुटले.नकार मिळताच आरोपींचा पारा चढला. आरोपी करण तांदळे याने चाकू काढून तर जय भांडारकर याने थेट पिस्टल (बंदूक) रोखून टपरीचालकाला जीवे मारण्याची धमकी दिली. दिवसाढवळ्या भर वस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.केवळ धमकावूनच आरोपी थांबले नाहीत, तर त्यांनी फिर्यादीला ढकलून देऊन टपरीच्या गल्ल्यातील ७ हजार रुपये रोख आणि सिगारेटची पाकिटे बळजबरीने हिसकावून घेतली. पोलिसात तक्रार केली तर घरच्यांना संपवून टाकू, अशी धमकी देऊन आरोपी दुचाकीवरून पसार झाले.

## शरद पवार – गौतम अदानी भेट

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०२ फेब्रुवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उद्योगपती गौतम अदानी यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मुंबईतील निवासस्थानी भेट घेतली. सिल्व्हर ओक येथील पवारांच्या घराती दोघांमध्ये जवळपास ४५ मिनिटांहून अधिक काळ चर्चा झाली. अजित पवार यांच्या निधनाच्या पार्श्र्वभूमीवर ही सांत्वनपर भेट असल्याचे मानले जाते. परंतु या भेटीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमधील संभाव्य राजकीय विलीनीकरणाच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.



गौतम अदानी यांनी रविवारी सायंकाळी शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट दिली. या भेटीत दोघांमध्ये ४५ मिनिटांहून अधिक काळ चर्चा झाली. अजित पवार यांच्या निधनानंतर शोक व्यक्त करण्यासाठी ही भेट असल्याचे अधिकृतपणे सांगण्यात आले. मात्र या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. कारण सुनेत्रा पवार यांनी अजित दादा यांचा वारसा चालवण्यासाठी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये सध्या घडामोडींना वेग आला आहे.

## रोहित पवारांनी कॅप्टन शांभवी पाठक यांच्या कुटुंबियांना दिला धीर

**दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून राज्यामध्ये अजित पवारांच्या दुःखद अपघाती निधनामुळे शोककळा पसरलेली आहे. अनेकांनी दादांच्या अशा निधनावर विविध प्रतिक्रिया दिल्या. विमान अपघातात अजित पवारांबरोबर आणखी ५ जणाचंही दुर्दैवी निधन झालं आहे. दरम्यान, यामध्ये दादांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव, फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी, पायलट-इन कमांड सुमित कपूर आणि सेकंड इन कमांड कॅप्टन शांभवी पाठक हे देखील दादांबरोबर विमानात होते. त्यांनीही यावेळी जगाचा निरोप घेतला आहे.



दरम्यान, अजित पवारांचे पुतणे आणि कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवारांनी आज सेकंड इन कमांड शांभवी पाठक यांच्या कुटुंबियाची भेट घेतली आहे. दिल्ली येथील पाठक यांच्या निवासस्थानी जात रोहित पवारांनी शांभवी यांच्या आई वडिलांसह कुटुंबियांचं सांत्वन केलं आहे.याबद्दलची एक पोस्टही रोहित पवारांनी सोशल मीडियावरुन शेअर केली आहे.बारामतीतील विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झालेल्या तरुण सह-वैमानिक कॅप्टन शांभवी पाठक यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन विचारपूस केली. लष्कराची पार्श्र्वभूमी असलेले तिचे वडील आणि शैक्षणिक पार्श्र्वभूमी असलेल्या तिच्या आईचं दुःख हे अंत्यंत मोठं आहे. आपल्या मुलीच्या लग्नाचं स्वप्न हे माता-पिता बघत असताना ही दुर्दैवी घटना घडली आणि त्यात एका कर्तृत्ववान मुलीचा बळी गेला,असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## मराठवाड्यात विमानतळ केवळ कागदावरच ?; विकासाच्या उड्डाणालाच ब्रेक

### विमानतळ आहेत, पण उड्डाणं नाहीत !
### रनवे, टर्मिनल आणि मूलभूत सुविधांचा अभाव !!



**तभा वृत्तसेवा/राजाराम मस्के**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०२ फेब्रुवारी : मराठवाडा हा ऐतिहासिक, औद्योगिक आणि शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश असतानाही आजही विमानसेवेच्या बाबतीत मागेच आहे. केंद्र व राज्य सरकारकडून विमानतळ विकासाच्या घोषणा सातत्याने केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात अनेक विमानतळ नावापुरतेच अस्तित्वात असल्याचं वास्तव समोर येत आहे. काही ठिकाणी अपुरा रनवे, तर काही ठिकाणी टर्मिनल, एअर ट्रॅफिक कंट्रोल (ATC), नाईट लँडिंग किंवा अग्निशमन सुविधांचाच अभाव आहे.**



मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विमानतळासाठी जागा अधिग्रहण, रनवेचं काम किंवा सीमित पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या. मात्र नियमित प्रवासी उड्डाणांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा आजही अपूर्ण आहेत. परिणामी विमानतळ असूनही प्रवासी सेवा सुरू होऊ शकलेल्या नाहीत किंवा सुरू झालेल्या सेवा काही महिन्यांत बंद पडतात.

हवाई वाहतुकीसाठी रनवेची लांबी, मजबुती आणि सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असते. मराठवाड्यातील काही विमानतळांवर रनवेची लांबी मोठ्या प्रवासी विमानांसाठी अपुरी आहे. काही ठिकाणी रनवे असला तरी त्याचं मजबुतीकरण, ड्रेनेज किंवा नाईट ऑपरेशन्ससाठी आवश्यक असलेली लायटिंग व्यवस्था नाही.

**प्रवासी टर्मिनल अपूर्ण किंवा अस्तित्वातच नाही**

प्रतिक्षागृह, तिकीट काउंटर, सुरक्षा तपासणी व्यवस्था अपुरी, फायर सेफ्टी, इंधन भरण्याची सुविधा नाही,एअर ट्रॅफिक कंट्रोलची व्यवस्था नसल्याने उड्डाणांवर मर्यादा, या कारणांमुळे विमान कंपन्या या विमानतळांवर नियमित सेवा देण्यास उत्सुक नसल्याचं चित्र आहे.

मराठवाडा हा औद्योगिकदृष्ट्या उभरता प्रदेश मानला जातो. मात्र प्रभावी विमानसेवा नसल्यामुळे उद्योग, गुंतवणूकदार आणि आयटी-सेवा क्षेत्रावर त्याचा थेट परिणाम होत आहे. अनेक उद्योजकांना पुणे, मुंबई किंवा हैदराबादमार्गे प्रवास करावा लागत असल्याने वेळ आणि खर्च दोन्ही वाढतो.मराठवाड्याच्या वाट्याला नेहमीच उपेक्षा आली. पाणी, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि आता हवाई संपर्कही. विमानतळ उभारले गेले, उद्घाटनं झाली, फलक लावले गेले; पण प्रत्यक्षात मराठवाड्याच्या आकाशात आजही प्रवासी विमानं दिसत नाहीत. हा विकास आहे की विकासाचं नुसतं नाटक?

गंभीर रुग्णांना तातडीने मोठ्या शहरांतील रुग्णालयात हलवण्यासाठी हवाई सेवेचा उपयोग होऊ शकतो. मात्र विमानतळांवरील अपुऱ्या सुविधांमुळे एअर ॲम्ब्युलन्ससारख्या सेवाही मर्यादित राहतात. विमानतळ विकासासाठी केंद्र, राज्य सरकार आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI) यांच्यात समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. निधी मंजूर होतो, पण काम वेळेत पूर्ण होत नाही. याचा फटका थेट मराठवाड्यातील नागरिकांना बसतो.

#### UDAN योजना कागदावरच ?

केंद्र सरकारच्या UDAN (उडे देश का आम नागरिक) योजनेत मराठवाड्यातील काही विमानतळांचा समावेश करण्यात आला. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी अत्यंत संथ असून अनेक मार्गांवरील उड्डाणे बंद झाली आहेत. आवश्यक पायाभूत सुविधा पूर्ण न करता केवळ घोषणा करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

#### लातूर : विमानतळ आहे, पण नियमित उड्डाण नाही

लातूर विमानतळाचा मोठ्या थाटात विकास जाहीर करण्यात आला. मात्र आजही नियमित प्रवासी सेवा सुरू होऊ शकलेली नाही. रनवे मर्यादा, नाईट लँडिंग सुविधांचा अभाव आणि विमान कंपन्यांची अनास्था यामुळे लातूरकरांना हवाई सेवेपासून दूरच राहावं लागत आहे.

#### धाराशिव (उस्मानाबाद) : कागदावरचा विकास

धाराशिव विमानतळाचा समावेश UDAN योजनेत करण्यात आला. प्रत्यक्षात मात्र प्रवासी टर्मिनल, फायर सेफ्टी आणि ATC सुविधा अपुऱ्या असल्याने विमानसेवा सुरूच होऊ शकलेली नाही. विमानतळ असूनही प्रवासी रस्त्यानेच प्रवास करत आहेत.

#### परभणी : रनवे आहे, पण उड्डाणासाठी अपुरा

परभणी विमानतळावर धावपट्टी असली तरी ती आधुनिक विमानांसाठी अपुरी ठरत आहे. टर्मिनल सुविधा अत्यंत मर्यादित असून कोणतीही नियमित विमानसेवा उपलब्ध नाही. परिणामी हा विमानतळही शोभेची वस्तू बनला आहे. परभणी जिल्ह्याच्या सर्वंकष विकासासाठी विमानतळ नियमित व्हावा.

#### नांदेड : अपवाद ठरणार की अपयश?

नांदेड विमानतळावर काही काळ उड्डाणे सुरू होती. मात्र सातत्य नसल्याने प्रवासी संख्या घटली आणि सेवा बंद पडल्या. आवश्यक सुविधा असूनही नियोजनाच्या अभावामुळे नांदेड विमानतळही सध्या अर्धवट अवस्थेत आहे.

#### हिंगोली : केवळ प्रस्तावात अडकलेला विमानतळ

हिंगोली जिल्ह्यात विमानतळाच्या घोषणा अनेकदा झाल्या. प्रत्यक्षात मात्र पायाभूत सुविधा, रनवे आणि टर्मिनल या सगळ्या बाबी अजूनही प्राथमिक टप्प्यातच आहेत. जिल्ह्याला विमानसेवा कधी मिळणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

#### बीड : दुष्काळग्रस्त जिल्ह्याला दुहेरी मार

बीडसारख्या दुष्काळग्रस्त जिल्ह्याला प्रभावी हवाई संपर्काची नितांत गरज असताना येथील विमानतळ विकास रखडलेलाच आहे. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, उद्योग आणि पर्यटनासाठी महत्त्वाचा ठरू शकणारा विमानतळ आजही निष्क्रिय आहे.

#### जालना : औद्योगिक जिल्हा, पण हवाई संपर्क शून्य

औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या जालना जिल्ह्यातही विमानतळाची अवस्था निराशाजनक आहे. उद्योगांना चालना देणारी विमानसेवा नसल्याने गुंतवणूकदार इतर शहरांकडे वळत असल्याचं चित्र आहे. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासाठी हवाई सेवा आवश्यक आहे

## थोडक्यात...

### बनावट उत्पादनांविरोधात लढा देण्यासाठी टाटा सॉल्टची मोहीम

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आयोडाइज्ड मीठ विभागात १९८३ पासून अग्रणी आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड असलेल्या टाटा सॉल्टतर्फे 'हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता' हा ठाम संदेश देत, बनावट मीठ पॅकविरोधात लढ्याचे नेतृत्व करण्यात येत आहे. विशेषतः उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या असंघटित मीठ बाजारपेठेत आणि बनावट मीठ पॅकच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्र्वभूमीवर शुद्धता व विश्र्वासाचे नवे मापदंड प्रस्थापित करत, ही जाहीर घोषणा टाटा सॉल्टच्या उत्कृष्ट दर्जाचे मीठ पुरवण्याच्या ठाम वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने जानेवारी२०२६ मध्ये ३३,८८० युनिट्सची विक्री नोंदवली

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटाकिर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज जानेवारी २०२६ महिन्याच्या विक्री कामगिरीची घोषणाकेली. कंपनीने जानेवारी २०२५ मध्ये विक्री झालेल्या २९,३७१ युनिट्सच्या तुलनेत जानेवारी२०२६ मध्ये एकूण ३३,८८० युनिट्सची विक्री नोंदवली. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत३०,६३० युनिट्सची विक्री झाली असून ३,२५० युनिट्सची निर्यात करण्यात आली. हे प्रमुखमॉडेल्ससाठी सातत्यपूर्ण ग्राहक मागणी आणि विश्र्वसनीय व मूल्याधारित मोबिलिटी सोल्यूशन्सदेण्याच्या टीकेएम च्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

### स्वच्छ आणि स्मार्ट ऑटोमोटिव्ह सोल्यूशन्स सादर केले

**पुणे :** प्रगत चाचणी आणि मापन तंत्रज्ञानातील जागतिक अग्रणी असलेल्या जपान-आधारित होरिबा ग्रुपची उपकंपनी असलेल्या होरिबा इंडिया ने, ऑटोमोटिव्ह उद्योगातील सर्वात प्रभावशाली जागतिक मंचांपैकी एक असलेल्या सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी २०२६ मध्ये सहभाग घेऊन, स्वच्छ गतिशीलतेसाठी आपले भविष्य-सज्ज उपाययोजना सादर केल्या. होरिबा इंडियाने या कार्यक्रमात जागतिक कौशल्य आणि स्थानिक नाविन्यपूर्णतेचे प्रभावीपणे एकत्रीकरण करून, स्मार्ट आणि स्वच्छ गतिशीलतेला चालना देण्यासाठी आपले स्थान अधिक मजबूत केले. यावेळी त्यांनी आपले पहिले स्थानिक पातळीवर विकसित केलेले इलेक्ट्रोलायझर टेस्ट स्टेशन (एक स्वदेशी इलेक्ट्रोलायझर चाचणी प्लॅटफॉर्म जे कार्यक्षमता, कामगिरी, टिकाऊपणा वाढवते आणि हरित हायड्रोजन उत्पादनाचा खर्च कमी करते) सादर केले.

### फर्निचर उत्पादनातून भारताच्या विकासाला नवी चालना

**मुंबई :** २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ दरम्यान बंगळुरू येथील बेंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर येथेइंडियावुड २०२६ या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या या द्वैवार्षिक प्रदर्शनाची ही २६ वी आवृत्ती असून, लाकूड प्रक्रिया, फर्निचर उत्पादन व मॅट्रेस निर्मिती क्षेत्रातील एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद म्हणून इंडियावुड ओळखली जाते. या प्रदर्शनाला युरोपियन फेडरेशन ऑफ वुडवर्किंग मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स यांचे अधिकृत पाठबळ आहे.

### आयडीएफसी फर्स्ट बँक ५०३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत, ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांना मंजुरी दिली. निकालांवर भाष्य करताना बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले की, आमच्या कर्ज वितरण, ठेवी, वेल्थ मॅनेजमेंट, ट्रान्झॅक्शन बँकिंग यांसारख्या सर्व प्रमुख व्यवसायांमध्ये आम्हाला व्यवसायाची मजबूत गती दिसून येत आहे. ३१ डिसेंबर २०२५ अखेर एकूण अनुत्पादित कर्ज (जीएनपीए) १.६९% आणि निव्वळ अनुत्पादित कर्ज (एनपीए) ०.५३% वर आल्यामुळे आमच्या मालमत्तेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे.

### नेरुळ व वाशी पोलीस ठाण्यात विशेष आरोग्य जनजागृती उपक्रम

**नवी मुंबई :** देशाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या भारतीय लष्कर व पोलीस दलाच्या जवानांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने पारसनाथ स्पेशालिटी क्लिनिक यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्र्वभूमीवर विशेष आरोग्य जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची संकल्पना होती - सुरक्षित भारत, स्वस्थ भारत, वेदनामुक्त भारत. या उपक्रमांतर्गत आर्मी सीएचएस, नेरुळ येथे लष्करातील अधिकारी, जवान व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विशेष आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये गुडघेदुखी, पाठदुखी व मणक्याच्या वेदनांवर शस्त्रक्रियेविना आयुर्वेदाधारित उपचारपद्धती कशा प्रकारे परिणामकारक ठरू शकतात, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

### चेंज द सोच- कन्याकुमारी ते काश्मीर अभियान

**नांदेड :** चेंज द सोच- कन्याकुमारी ते काश्मीर अभियान हा फ्रँकलिन टेम्पलटनचा अनोखा, राष्ट्रव्यापी उपक्रम नांदेडमध्ये पोहोचला आहे, ज्याचा उद्देश विशेषतः महिलांमध्ये आर्थिक सक्षमतेचा प्रचार करण्याचा आहे. फ्रँकलिन टेम्पलटनच्या भारतातील ३० वर्षांच्या वाटचालीचा गौरव करणारा हा ३०-दिवसांचा प्रवास कन्याकुमारी या देशाच्या दक्षिण टोकापासून सुरू झाला असून २१ शहरांमधून मार्ग काढत श्रीनगर, जम्मू आणि काश्मीर येथे समाप्त होणार आहे. इंटरॅक्टिव्ह आर्थिक साक्षरता सत्रे, तज्ज्ञांचे विचार आणि समुदायाचा सहभाग या माध्यमातून या मोहिमेचा उद्देश म्यूचुअल फंड गुंतवणुकीशी निगडीत गैरसमज दूर करण्याचा तसेच हजारो भारतीयांना त्यांच्या आर्थिक भविष्याचा ताबा स्वतःच्या हाती घेण्यासाठी आत्मविश्र्वास देण्याचा आहे.

# आयएमए हेल्दी सिटी मॅरेथॉन उत्साहात; ४५० हून अधिक धावपटूंचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०२ फेब्रुवारी :** इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) छत्रपती संभाजीनगरतर्फे आयोजित पहिली हेल्दी सिटी मॅरेथॉन २०२६ रविवारी उत्साहात पार पडली. आरोग्य, तंदुरुस्ती व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास समाजातील विविध घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

डॉ. अनुपम टाकळकर यांच्या संकल्पनेतून, डॉ. शिवाजी पोळे, डॉ. योगेश लक्कास, डॉ. आसावरी टाकळकर व डॉ. गितेश दलवी यांच्या प्रयत्नांतून मॅरेथॉन साकार झाली. ४५० हून अधिक धावपटूंनी सहभाग घेतला. डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी, नागरिक व लहान मुलांनीही धाव घेत 'आरोग्य सर्वांसाठी' हा संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात पूर्वतयारी व्यायाम सत्राने झाली. प्रारंभ व समारोप आयएमए हॉल येथून झाला. दहा पेक्षा अधिक मान्यवर प्रतिनिधींनी पाठिंबा दिला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे प्रमुख अतिथी होते. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी आरोग्यासाठी धावणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

आयएमए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, सचिव डॉ. योगेश लक्कास, कोषाध्यक्ष व आयोजन अध्यक्ष डॉ. शिवाजी पोळे, डॉ. यशवंत गाडे, डॉ. दत्ता कदम, डॉ. आसावरी टाकळकर, डॉ. अंजली गाडे, संयुक्त सचिव डॉ. गितेश दलवी व डॉ. संभाजी चिंतळे यांनी विशेष परिश्रम घेतले. विजेत्यांचा गौरव करण्यात आला. सुरक्षित आयोजनासाठी पोलीस विभागाच्या सहकार्याबद्दल आयएमएतर्फे आभार मानले.

## महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**अजिंठा, दि. ०२ फेब्रुवारी :** अजिंठा येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता दहावीच्या व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय जीवनाचा हा महत्त्वाचा टप्पा पार करून पुढील आयुष्याच्या प्रवासासाठी सज्ज झालेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री एम व्ही देशमुख सर,तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून अजिंठा पोलीस स्टेशनचे एपीआय श्री अमोलजी ढाकणे साहेब हे होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड येथील डॉ. दत्ता काकडे सर व प्रा. अजिनाथ काकडे सर यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेतील विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रमुख पाहुणे एपीआय श्री ढाकणे साहेबांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी जीवनात शिस्त मेहनत, प्रामाणिकपणाचे महत्त्व अधोरेखित करत असतांना सोशल मीडियाचे फायदे व तोटे काय आहेत आणि त्याचा योग्य व मर्यादित वापर कसा करावा तसेच



आई -वडील, गुरु व सुसंगत यांचे आपल्या जीवनात असलेले महत्त्व व स्थान याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनती शिवाय पर्याय नाही याचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य श्री देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना निरोप समारंभ हा केवळ निरोप नसून नवीन वाटचालीची सुरुवात आहे असे सांगत आई-वडिलांसोबत गुरूंचेही व शाळेचेही नाव मोठे करा असा संदेश देऊन सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री झलवार सर यांनी मनोगत व्यक्त करतांना आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे या स्पर्धेत जो टिकेल तो खरा यशस्वी होईल पुढे खूप काही शिकण्यासारखे आहे आणि त्यासाठी जिद्द व मेहनत महत्त्वाची आहे याचे महत्त्व पटवून दिले. अशा या भावस्पर्शी कार्यक्रमात बऱ्याच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री बदर व त्रिशा झलवार या विद्यार्थिनींनी, तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. गोपीनाथ डापके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री गवळी सर,श्रीमती सूर्यवंशी मॅडम,श्री पायघन सर, श्री भाऊसाहेब जंगले सर, प्रा.बुलबुले सर, प्रा जंजाळ सर, प्रा मोरे सर, श्री पालोदकर पि. जी. सर, श्री लोकेश सर, श्री सचिन सर, श्री जाधव सर, श्री पाटील सर प्रा घोंगडे सर, श्रीमती परदेशी मॅडम,दिनेश भैय्या, पवार, शेळके आदींनी परिश्रम घेतले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## ११ व्या अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप; 'परज्या'ला सुवर्ण कैलास

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०२ फेब्रुवारी :** जगभरातील उत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या ११ व्या अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप सोहळा आज प्रोझोन मॉल येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. भारतीय चित्रपट स्पर्धा विभागातील सर्वोच्च सुवर्ण कैलास पारितोषिक दिग्दर्शक महादेव हडपड यांच्या परज्या या चित्रपटास प्रदान करण्यात आले. या पारितोषिकात एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले.

समारोप कार्यक्रमास दिग्दर्शक व निर्माते आनंद एल. राय, ऑस्कर विजेते ध्वनी रचनाकार पद्मश्री रसूल पूकुट्टी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.आनंद एल. राय यांनी आवडीचे कार्य करत राहणे हेच खरे जीवन असल्याचे सांगत यश-अपयशातून शिकण्याची गरज अधोरेखित केली. अंकुशराव कदम यांनी महोत्सवाचा वाढता राष्ट्रीय स्तरावरील विस्तार नमूद करत या उपक्रमातून शैक्षणिक व सामाजिक जाणीवा दृढ होत असल्याचे सांगितले. रसूल पूकुट्टी यांनी प्रेक्षकांचे चित्रपटप्रेम हेच महोत्सवाच्या यशामागील मुख्य कारण असल्याचे म्हटले.

इतर पारितोषिकांमध्ये सर्वोत्तम अभिनेता प्रज्वल कोल्लाळ (परज्या), सर्वोत्तम अभिनेत्री नाझ शेख व सर्वोत्तम पटकथा अनुपर्णा रॉय (साँग्स ऑफ फॉरगॉटन ट्रीज) यांचा सन्मान झाला. फ्रिप्रेसी इंडिया पुरस्कारही याच चित्रपटास मिळाला. मराठवाडा लघुपट स्पर्धेत मुक्ता - आर्टिकल २१ ए सर्वोत्तम ठरला, तर एमजीएम लघुपट स्पर्धेत निर्वाणला पुरस्कार मिळाला. प्रेक्षक पसंतीचा पुरस्कार साबर बोंड या चित्रपटास प्रदान करण्यात आला.महोत्सवात आनंद एल. राय यांचा विशेष मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आला होता. 'एमजीएम इन्स्पायर' या वृत्तपत्राचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिव कदम यांनी केले, तर आभार संयोजक नीलेश राऊत यांनी मानले.

## श्री संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद दि २ फेब्रुवारी :** येथे संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. रोहिदास महाराजांच्या प्रतिमेस ज्येष्ठ नागरिक पुरुषोत्तम नारायण जाधव यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी सुनील जाधव, सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ, अतुल जगताप, सोमिनाथ जाधव ,रोहिदास जाधव, स्वराज जाधव इत्यादी उपस्थित होते.



# शिवसेना-भाजप युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जामगाव येथे प्रचार सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि. ०२ फेब्रुवारी :** जामगाव जिल्हा परिषद गटातून शिवसेना भाजप युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब शिवसेनेचे माजी आमदार अण्णासाहेब माने पाटील माजी आमदार कैलास पाटील यांची जामगाव येथील जगदंबा देवीच्या प्रांगणात प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सर्वच मान्यवरांनी युतीच्या उमेदवाराला निवडून आणण्याचे



आव्हान केले.

खासदार संदिपान भुमरे म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकार विकास कामासाठी खंबीर असून आगामी काळात शेती , पानंद रस्ते आदी विकास योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

आमदार प्रशांत बंब म्हणाले की, तालुक्यातील आणि राज्यातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना दर्जेदार शिक्षण देण्यावर भर असून सर्व शाळा मधील शिक्षकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर चांगला परिणाम दिसून येणार आहे.

माजी आमदार अण्णासाहेब पाटील म्हणाले, जामगाव गटातून युतीच्या उमेदवाराला भरघोस मतांनी निवडून आणणारच असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी महायुतीचे उमेदवार जिल्हा परिषद जामगाव गटातून स्वाती दिलीप निरपळ, पंचायत समिती जामगाव गणातून प्रमिला विनोद काळे, पंचायत समिती कायगाव गणातून बाबासाहेब एकनाथ चव्हाण हे उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. तर जामगाव जिल्हा परिषदगटातून अपक्ष उमेदवार दिपा सचिन मुंदडा, निवडणूक लढवत असल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे.

यावेळी दिलीप निरपळ संतोष माने पाटील मारुती साळवे यांच्यासह शिवसेना भाजप युतीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कौटुंबिक वादाला कंटाळूत घर सोडून गेलेल्या दोन अल्पवयीन मुलींची सुटका

### पैठण पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०२ फेब्रुवारी :** कौटुंबिक वादाला कंटाळून घर सोडून गेलेल्या पैठण येथील दोन अल्पवयीन मुलींना छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी मध्यप्रदेशातील हरदा आणि खांडवा जिल्ह्यातून सुरक्षित शोधून काढले आहे. 'ऑपरेशन मुस्कान-१४' मोहिमेअंतर्गत पैठण पोलिसांनी ही धडाकेबाज कारवाई केली.

पैठण शहरातील शाहगड रोड परिसरातील १५ आणि १६ वर्षीय दोन मुली ९ जानेवारी २०२६ च्या रात्री अचानक घरातून निघून गेल्या होत्या. नातेवाईकांनी शोध घेऊनही त्या न मिळाल्याने पैठण पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली या मुलींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तैनात करण्यात आले होते.

तपासादरम्यान पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक मुलगी मध्यप्रदेशातील हरदा येथे आहे. पथकाने तात्काळ तेथे पोहोचून मुलीला ताब्यात घेतले. तिच्याकडे विचारपूस केली असता, दुसरी मुलगी खांडवा जिल्ह्यातील खालवा येथे असल्याचे समजले. पोलिसांनी दोन्ही मुलींना विश्वासात घेऊन विचारले असता, घरातील लग्नाच्या वादाला कंटाळून आम्ही स्वतःहून घर सोडले



होते, असे त्यांनी सांगितले.

दोन्ही मुलींना सुरक्षितपणे पैठण येथे आणण्यात आले. बालकल्याण समितीच्या (उथउ) आदेशानुसार त्यांना त्यांच्या आईच्या ताब्यात देण्यात आले आहे. या मोहिमेमुळे दोन कुटुंबांची ताटातूट थांबली असून पोलिसांच्या संवेदनशीलतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक: महादेव गोमारे

पथकप्रमुख पीएसआय संभाजी खाडे, पो.अं. विलास सुखदान, म.पो.अं. कोमल कोतकर यांनी यशस्वी केली. आपल्या परिसरात कोणी संशयास्पद किंवा हरवलेली व्यक्ती,मुलगा,मुलगी आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पैठण पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी केले आहे आहे. तालुक्यातील दावरवाडी येथील बेपत्ता झालेली अल्पवयीन मुलगी बीडकीन येथे सापडल्याची घटना सध्या ताजी आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि. अर्ज क. ८९/ २०२६

अर्जदार :- १) विजयकुमार पि. कडुजी शिरसाठ, वय ५७ वर्ष, धंदा नौकरी, रा.जयसिंगनगर, गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २) छाया भ्र. गंगाधर शिंगारे, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. वडगाव कोल्हाटी, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, ३) संगीता भ्र. नानासाहेब मोरे, वय ५८ वर्ष, धंदा घरकाम, रा.समतानगर, गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर ४) अनुसयाबाई भ्र. कडुजी शिरसाठ, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम. रा. समतानगर, गंगापुर, ता. गंगापुर,जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्ये भाऊ बहीन असुन अर्जदार क. ४ ही त्यांची आई आहे. अर्जदार क. १ ते ३ यांचे वडील तसेच अर्जदार क. ४ हिचे पती नामे कडुजी पि. सावळीराम शिरसाठ हे दिनांक ०८/०५/२००९ रोजी गंगापुर येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे मयत कडुजी यांचे वारस असुन त्यांच्या व्यतीरिक्त कुणीही मयतास वारस नाहीत. मयत कडुजी यांचे आई वडील हे दोघेही फार पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांना शासकीय कामाकरीता ते मयत कडुजी पि. सावळीराम शिरसाठ यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही वअर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक.०२/०२/२०२६ रोजी दिले.

आदेशावरून

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**गंगापूर, ता. गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, क-स्तर कन्नड यांचे न्यायालयात**

दि. किरकोळ अर्ज क्रं. ६१२/२०२५

अर्जदार - १. निलेश पि. देविदास गुंड (पाटील), वय ३२ वर्ष, धंदा शिक्षण, रा. मेन रोड, समर्थ नगर, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर. २. ज्योती भ्र. देविदास गुंड (पाटील), वय ४५ वर्ष, धंदा घरकाम, रा. मेन रोड, समर्थ नगर, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार

:-निरंक

अर्ज :-बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ अन्वये अर्जदार नं. १ व २ हे मयत देविदास सुर्यभान गुंड (पाटील) यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. सचिन एस. बोरसे यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार नं. १ ते २ हे वरील प्रमाणे रहिवाशी असून अर्जदार नं. १ हा अर्जदार नं. २ चा मुलगा असुन अर्जदार नं. २ ही अर्जदार नं. १ ची जन्मदाती आई आहे. अर्जदार नं. १ चे पिता व अर्जदार नं. २ चे पती नामे देविदास सूर्यभान गुंड (पाटील) यांचा दिनांक ११/११/२०२५ रोजी आजारपणात मृत्यू झालेला आहे. मयत देविदास सुर्यभान गुंड (पाटील) यांना अर्जदार नं. १ ते २ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस हयात नाहीत. मयत देविदास सुर्यभान गुंड (पाटील) यांचे अर्जदार नं. १ ते २ हे कायदेशीर वारस असल्याने त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार नं. १ ते २ यांनी मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते २ हे मयत देविदास सुर्यभान गुंड (पाटील) यांचे कायदेशीर वारस असल्या बाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यां तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत आपला आक्षेप उजर सादर करावा. मुदतीत उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यारा सदर अर्जदार नं. १ ते २ हे मयत देविदास सूर्यभान गुंड (पाटिल) यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक : २०/१/२०२६

आदेशानुसार

**विभागीय लिपिक**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, कन्नड**

### जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया मॅडम, सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र. ६०५/२०२५

पुढील तारीख १६/०२/२०२६

अर्जदार १) आशाबाई भ. रविंद्र मोरे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. काळखेडा, ता. जि. धुळे २) शिवाजी पि. भिका पिंपळे, वय ४९ वर्षे, धंदा. शेती, रा. विठ्ठलपुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद

गैरअर्जदार

अर्ज

विरुध्द

निरंक

मा. महोदय,

Indian Succession Act 1925 प्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ व २ यांनी त्यांचे विधीज्ञ एस. आर. शिंदे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारसहक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ बहीन आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील नामे भिका शिवाजी पिंपळे हे होते ते दिनांक ३०/११/१९९७ रोजी मौजे विठ्ठलपुर ता. कन्नड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ व २ यांच्या आई नामे सुभाबाई भिका पिंपळे या देखील दिनांक २७/०४/२०२२ रोजी मौजे विठ्ठलपुर ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेल्या आहे व दोन्ही मयतांचा अंत्यविधी विठ्ठलपुर ता. कन्नड येथे झालेला आहे. दोघांचेही मृत्यूचे दाखले अर्जासोबत देत आहे. दोन्ही मयतास अर्जदार क्र. १ व २ हेच एकमेव कायदेशीर वारस आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी बारस हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल, तसेच तलाठी कार्यालयास सदरील वारसाची नोंद करणे आहे. त्यामुळे वारस हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच मयत सुभाबाई यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा कन्नड येथील असलेले खाते क्र. ३६२९२६५६२५६ या खात्यावर मयताच्या नावे रक्कम रुपये ७९,९३३/-रुपये जमा आहे. तसेच स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा कन्नड यांना देण्यासाठी सदरील वारस हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. संबंधीत बँकेचे अधिकरी यांनी दिनांक १९/१२/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्याने सदरील अर्ज करण्यास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,

दिनांक २२/०१/२०२६

**क. लिपिक** आदेशावरुन
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.**

### जाहीर प्रगटन

**मा. आर. एस, तापडीया मॅडम, सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात**

अर्जदार:

पुढील तारीख १३/०२/२०२६

दि.कि.अर्ज क्र. ५७८/२०२५

१) संभाजी पि. विकूल चित्ते, वय. ३८ वर्षे, धंदा शेती, रा सायगव्हाण ता. कन्नड, निज. औरंगाबाद २) धोंडू पि. विठ्ठल चित्ते, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. सायगव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) शिवाजो पि. विठ्ठल चित्ते, वय. ३१ वर्षे धंदा. शेती, रा. सायगव्हाण ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४) ललीता भ्र. राजेंद्र जाधव, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा पिंप्री ता. चाळीसगाव, जि. जळगाव ५) नभाबाई देविदास सोनवणे, वय ४२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सायगव्हाण ता कन्नड, जि. औरंगाबाद ६) संगीता भ्र. सुनिल कोळी, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोटार ता. पाचोरा, जि. पाचोरा ७) कल्पना भ. राजेंद्र निकम, वय ४१ वर्षे, धंदा. घरकाम रा. उत्रान ता. ऐरंडोल, जि. जळगाव ८) सरलाबाई भ्र राजेंद्र कोळी, वय. ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. उत्रान ता ऐरंडोल, जि. जळगाव

९) छायाबाई भ. गणेश चव्हाण, वय ३० वर्षे, धंदा घरकाम रा. वडगाव ता. चाळीसगाव, जि. जळगाय

१०) केसरबाई भ. विठ्ठल चित्ते, वय ७८ वर्षे, धंदा घरकम रा. सायगव्हाण ता. कन्नड, जि. औरंगाबाद

गैरअर्जदार

अर्ज

विरुध्द

निरंक

भा. महोदय,

वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थो अर्जदार क्र. १ ते १० यांनी त्यांचे विधीज्ञ एस आर. शिंदे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ९ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन असून अर्जदार क्र. १० ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ९ यांचे वडोल, अर्जदार क्र. १० यांचे पती नामे विठ्ठल गणपत चित्ते हे होते ते दिनांक ११/०५/२०१३ रोजी मौजे सायगव्हाण ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ९ यांचे आजी व आजोबा तसेच अर्जदार क्र. १० यांचे सासु व सासरे नामे गणपत मालजी चित्ते व गुंताबाई गणपत चित्ते मयत दिनांक ०४/०१/२००७रोजी मौने सायगव्हाण येथे मयत झालेल्या आहे, सोबत मयत गणपत विठ्ठल चित्ते यांचे गृप ग्रामपंचायत सायगव्हाण यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे अर्जदार यांना मयत विठ्ठल गणपत चित्ते यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी गट विकास अधिकारी पंचायत समिती यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,

दिनांक २३/०१/२०२६

क. लिपिक

आदेशावरुन

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, स्तर कन्नड

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास सुनील रावळे यांच्याकडून ग्रंथ भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी:** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास श्री. सुनील सीताराम रावळे यांनी एकून चार हजार एकशे ऐंशी रुपयांचे ग्रंथ भेट दिले. श्री रावळे हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे परीक्षा विभाग (वाणिज्य) येथे सहाय्यक अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. क्रमिक अभ्यासक्रम, सामाजिक चळवळ तसेच ललित साहित्याचा समावेश असलेली ही पुस्तके श्री. रावळे यांनी ग्रंथपाल श्री. विनोद भवाळे यांना विद्यापीठ परिसरात सुपूर्त केली.

माणसाच्या जडणघडणीत ग्रंथाचा वाटा फार मोठा असतो. सर्वांना शैक्षणिक, सामाजिक चळवळीची ओळख व्हावी.थोर महापुरुषांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधला जावा ,हाच उद्देश या ग्रंथ भेटीमागचा असल्याचे श्री.रावळे यांनी यावेळी सांगितले. यापूर्वीही त्यांनी स्वखर्चाने बऱ्याच महाविद्यालयांना अशा प्रकारचे ग्रंथ भेट दिले आहेत.

यावेळी ग्रंथ भेट देताना त्यांच्यासोबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या तथा संचालिका डॉ. एस. एस. मोकाने, अधीक्षक श्री. गणेश कोंडेकर, श्री. अनिल कळसकर, श्री. आशिष डहाळे,श्री. सुनील ढाले, श्री. संदीप कांबळे, श्री. विनायक जाधव, श्री. बळीराम चित्ते, श्री. बालाजी डुकरे, श्री. गजानन हंबर्डे,श्री. संतोष धामणे, श्री.आनंदा हंबर्डे ,श्री. अशोक जटाळे, श्री. वाघमारे ही विद्यापीठातील मंडळी उपस्थित होती. संस्था सचिव सौ. मीनाताई रामप्रसादजी बोर्डीकर यांनी श्री. रावळे यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### परभणीत हजरत सय्यद शाह तुराबुल हक साहेब (रहे.) उरुसास प्रारंभ



**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी शहरातील प्रसिध्द हजरत सय्यद शाह तुराबुल हक साहेब (रहे.) यांचा वार्षिक उरुस आजपासून उत्साहात सुरू झाला आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, तहसीलदार डॉ. संदीप राजापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथेप्रमाणे धार्मिक विधी पार पाडत उरुसाला प्रारंभ झाला. संदलमध्ये स्वतः जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी तबक डोक्यावर घेऊन संदलला रीतसर सुरुवात केली. उरुसाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होत असून भाविकांच्या सुविधा व सुरक्षेसाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

### झिरो फाटा येथील लूट व मारहाण प्रकरणातील आरोपी मुद्देमालासह ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी:** पूर्णा पोलिस ठाणे हद्दीतील झिरो फाटा परिसरात हत्यार दाखवून पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत फिर्यादीस मारहाण केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपींना पूर्णा पोलिस आणि स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने संयुक्त कारवाई करत २४ तासांच्या आत मुद्देमालासह आरोपीस शनिवारी(दि. ३१) ताब्यात घेतले.

मंगळवारी झिरो फाटा परिसरात आरोपीने हत्याराच्या जोरावर प्रवाशांकडून नगद पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत मारहाण केली होती. या प्रकरणी पूर्णा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाची पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी गंभीर दखल घेऊन स्थानिक गुन्हे शाखा आणि पूर्णा पोलिसांतील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून आरोपींचा तात्काळ शोध घेण्याबाबत आदेश दिले होते. यावरून अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान, गुन्ह्यातील आरोपी हे किनगाव येथे असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्यावरून पथकाने तात्काळ कारवाई केली.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्येकाच्या आचरणाचा भाग झाले पाहिजे-ना. शिरसाठ

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी:** जगाच्या पाठीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा प्रकारचे महापुरुष आहेत, त्यांच्या विचाराला कार्याला वंदन करणारे लाखो कोट्यावधी लोक आहेत. त्यांचे विचार आचरणात आणण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे.असा महापुरुष जगाच्या पाठीवर कुणी झाला नाही.





मी मुंबईला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्य स्मारकाला ६ डिसेंबरला अभिवादन करण्यासाठी गेलो त्या ठिकाणी लांबच लांब रांग अभिवादन करण्यासाठी होती. त्या ठिकाणी अनेक लेखकाचे डॉ.आंबेडकर यांच्यावर लिहिलेली पुस्तके लाखोच्या संख्येने आलेला जनसमुदाय विकत घेताना मला दिसला. माझे आजोबा यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर या ठिकाणी डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या बुद्ध धम्मदीक्षा सोहळ्याला ते हजर होते. त्यांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. आम्ही महामानव तथागत भगवान बुद्ध बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर व कार्यावर श्रद्धा ठेवून आम्ही चालणारी माणसं. डॉ.आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या उत्थानासाठी पाचशे कोटीची शासनातर्फे मदत केली.कारण आम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण विषयक विचार जिवंत ठेवायचा आहे तरुणांनी साध्या नोकऱ्या शोधण्यापेक्षा उच्च पदस्थ अधिकारी व्हावं उद्योग व्यवसायामध्ये यावं गाव तिथे बुद्ध विहार असलं पाहिजे. त्या ठिकाणी निधी देण्यासाठी मी तयार आहे. विहाराला लागून ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिकेची सोय सुद्धा केली पाहिजे. सामाजिक न्याय मंत्री म्हणून मी तुम्हाला सर्वतोपरी सहकार्य करायला तयार आहे. यावेळी बौद्ध धम्म परिषदेचे मुख्य मार्गदर्शक पूज्य भदंत डॉ उपगुप्त महाथेरो यांच्या धम्मकार्याविषयी गौरव उद्गार काढले. बुद्ध विहार ते डॉ. आंबेडकर नगर सिद्धार्थ नगर जोडणारा रेल्वे ओव्हर ब्रिज निर्मितीसाठी माझ्याकडे प्रस्ताव आणून द्या हा तुमचा जिव्हाळ्याचा प्रश्न मी निश्चितच पणे सोडवल्याशिवाय राहणार नाही. यावेळी धम्मपरिषद आधारित लिंबूनि स्मरणिकेचे विमोचन त्यांच्या हस्ते झाले. धम्मपिठावर दक्षिण कोरिया येथील पूज्य भंते युम जेयुंग हो तेथील बुद्धिस्ट युनिव्हर्सिटीचे व्हॉइस चान्सर डॉक्टर लि.ची. रेन त्याचप्रमाणे दक्षिण कोरिया येथील सुप्रसिद्ध महिला उद्योगपती श्रीमती एन नागिम श्रीमती किंम डोंग गीव व भारतीय भिकू संघाची उपस्थिती होती. डॉ. नितीन साळवे समन्वयक दक्षिण कोरिया भिक्षु संघ व भारतीय भिक्खू संघ यांनी दक्षिण कोरिया येथील पूज्य भंते व पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी दक्षिण कोरिया येथील पूज्य भंते वोमांग यांनी भारतामध्ये बुद्ध धम्माचं मोठ्या जोमाने पुनर्जीवन होताना दिसत आहे हे पाहून मला अतिशय आनंद होत आहे. भारत ही बुद्धाची भूमी आहे आम्हाला या भूमी विषयी नितांत आदर आहे अशा प्रकारचे गौरव उद्गार त्यांनी काढले. बुद्धिस्ट युनिव्हर्सिटीचे माजी व्हॉइस चान्सलर डॉक्टर लि.ची. रॅन यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्म जागृती विषयी धम्माच्या पुनर्जीवनासाठी त्यांनी केलेले प्रयत्न या देशामध्ये सामाजिक समता आणण्यासाठी दिलेले लढे याविषयी आपल्या विस्तृत भाषणामध्ये सांगितले. डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी बौद्ध धम्म परिषद आयोजना पाठीमागची भूमिका विशद केले. यावेळी दक्षिण कोरिया येथील पूजनीय भिक्खू संघ व भारतीय भिकू संघ यांच्या हस्ते स्मृतीशेस पूज्य भंते यांच्या चैत्य स्मारकाचे अनावरण झाले. परिषदेचे सूत्रसंचालन भदंत पयानंद भदंत धम्मशील यांनी केले परिषद आयोजन करण्यामध्ये विशेष परिश्रम केल्याबद्दल संयोजक भदंत पयावंश यांचा दक्षिण कोरिया येथील पूज्य भंते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पूर्णा नगरपालिकेच्या नगर अध्यक्ष विमलबाई कदम,पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष महाउपासक डॉ. एस. पी .गायकवाड सेवानिवृत्त सनदी अधिकारी आर के गायकवाड बुद्ध विहार समितीचे सचिव ॲड.महेंद्र गायकवाड, शिवसेना जिल्हाअध्यक्ष विशाल कदम, नगरसेवक प्रकाश कांबळे, उपनगराध्यक्ष मुकुंद भोळे,उत्तम खंदारे,अनिल खर्ग खराटे ॲड. धम्मदीप जोंधळे ,मिलिंद कांबळे आदी ,नगरपालिकेचे सर्व नगरसेवक परिषद यशस्वी करण्यासाठी बुद्ध विहार समिती धम्म सेवेत कार्यरत असलेली महिला मंडळ ,समता सैनिक दल ,स्काऊट गाईड आदींनी परिश्रम घेतले.

## पालम तिरुपती नगर मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पालम,/प्रतिनिधी-** शहरातील तिरुपती नगर येथे बालाजी मंदिराच्या पाठीमागील रस्त्यालगत सांडपाण्याची नाली पूर्णपणे बंद असल्या मुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले आहे .




सदरील सांडपाण्याच्या नालीतील पाणी हे चक्क मुख्य रस्त्यावरून असल्यामुळे येथील नागरिकांना हिवताप,डेंग्यू अशा अनेक आरोग्य विषयक समस्यांना तोंड दयावे लागत आहे तिरुपती नगर येथील रहिवासी अवधूत बालासाहेब जाधव पत्रकार यांच्या घरासमोर नालीतील सांडपाणी साचत असल्यामुळे घरामध्ये कसा प्रवेश करावा हे सुद्धा कठीण झाले आहे या गंभीर प्रकारामुळे या भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून या भागातील सांडपाण्याची व्यवस्था कायम करावी या संदर्भातील निवेदन पालम मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपंचायत यांना देऊन चार दिवस उलटले असून अद्यापही या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपंचायत पालम यांनी या प्रकरणाकडे अद्यापही दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे.



## पालम पोलीस स्टेशनची विशेष कामगिरी बारा दुचाकी वाहने जप्त

**पालम,/प्रतिनिधी-** पालम ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या दोन गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास सुरू असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आरोपी केशव सुभाष जाधव (रा.तांदुळवाडी, पालम) यांच्या ताब्याततून दुचाकी मिळून आली.

त्याची विचारपूस केली असता आरोपी हनुमंत रड्डेवाड (रा. परचंडा, ता.अहमदपूर), सिद्धेश्वर बुधवारे (रा.तांदुळवाडी, पालम) याच्यासोबत विविध ठिकाणी चोरी केलेल्या दुचाकी जेथे ठेवल्या होत्या तेथून मिळून आल्या.त्यानुसार एकूण आठ गुन्हे उघडकीस आले यात १२ दुचाकी किंमत साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी,अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुंजाळ, उपविभागीय पोलिस अधिकारी समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस निरीक्षक शेषराव खटाने,मंजुषा मोरे, शिवकांत नागरगोजे, उपनिरीक्षक गणेश सवंडकर, प्रकाश लोखंडे, गणेश खोमणे,प्रदीप सपकाळ ,शंकर कोलमवाड,भरत ठाकूर, सुदाम धुळगुंडे बाबू सिंगनवाड, साहेब इंगोले, अमोल हिवरे यांनी केली.

## जिंतूरच्या पोलीस निरीक्षकासह दोघांचा सन्मान

**जिंतूर / प्रतिनिधी -** फिर्याद नसतांनाही तालुक्यातील डोंगरतळा येथील सामूहिक अत्याचार प्रकरणाचा यशस्वी तपास करून आरोपीना बेड्या ठोकणार्या पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंड, बिट जमादार दत्तात्रय गुंगाने यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

डोंगरतला शिवारातील कमळजाई देवी मंदिर परिसरातील निर्जन ठिकाणी आपल्या मित्रांसह येणाऱ्या काही महिलांचा,तरुणीचा विनयभंग करून त्यांच्या जवळील नगद रक्कम,मोबाईल लुटल्याच्या घटना घडल्या होत्या.यातील एका घटनेची माहिती पोलीस निरीक्षक गजेंद्र कुमार सरोदे यांना मिळाली त्यांनी या बाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंड,बिट जमादार गुंगाने यांना सोबत घेत गोपनीय रित्या तपास करून यातील सहा आरोपिना ताब्यात घेतले होते.आरोपी व त्यांचे मोबाईल ताब्यात घेतल्या नंतर पोलिसांपुढे आव्हान होते फिर्यादी शोधण्याचे पोलीस निरीक्षक सरोदे व त्यांच्या सर्व टीम ने फिर्यादीचा शोध घेत पहिला गुन्हा नोंदवला त्या नंतर या आरोपिना अनेक गुन्हे केले असल्याचे तपासात पुढे आले त्यानंतर एका महिलेचा शोध घेत दुसरा विनयभंगाचा गुन्हा नोंदवण्यात आला पोलिसांच्या या तपासाची दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षकांनी वरील तिघांचाही प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

## तीर्थाटन'' योजना देवदर्शन घडविणार'सवलतीच्या दरात एसटी महामंडळाचा पुढाकार

**जिंतूर,/प्रतिनिधी:** राज्यात सर्वसामान्य भाविकांसाठी सवलतीच्या दरात माने सुरक्षितपणे राज्यातील धार्मिक स्थळाचे दर्शन व्हावे या करिता हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील राज्यमार्ग परिवहन महामंडळाने एसटी संगे तीर्थाटन ही विशेष योजना सुरू केलेली असून त्यानुसार परभणी जिल्ह्यातील जिंतूर आगारातून याबाबत नियोजन करण्यात आलेली असून मागणी होताच जिंतूर आगारातून बस उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण व बस स्थानक प्रमुख रामेश्वर सोनवणे यांनी दिली आहे.

सवलीच्या दरात आणि प्रवासातील सुरक्षितता अवलंबित सर्वसामान्य भाविकांसाठी ही सुरू केलेली योजना असून जिंतूर तालुक्यातील जास्तीत जास्त भाविकांनी या उत्कृष्ट तीर्थाटन योजनाचा लाभ घ्यावा. असेही कळविण्यात आलेले आहे.



भाविकांनी मागणी केल्यास प्रत्येक आगारातून पाच बसेस या तीर्थाटन योजने साठी देणार असल्याचे कळते.

ही तीर्थाटन योजना स्वस्त व सुरक्षित या ब्रीद वाक्यावर आधारित आहे.खाजगी वाहतूक विशेषतः ट्रॅव्हल्स वाहतूक प्रवास दर अधिक जास्त प्रमाणात असतात व विशेषता सुरक्षितेचेचा अभाव असतो. आधी सर्व बाबींचा विचार करता राज्यातील एसटी महामंडळाने सर्वसामान्य प्रवासी वर्गाला भक्तांना खिशाला परवडेल अशी ही तीर्थाटन योजना सवलतीच्या दरात अमलात आणली असून या योजनेमुळे भक्ताना राज्यातील विविध देवदर्शन घडणार आहे.

चाळीस प्रवाशांनी मागणी केल्यास बस होणार उपलब्ध शहर अथवा ग्रामीण भागातील गावातून ४० प्रवाशांचा गट तीर्थाटन योजनेस तयार झाल्यास जिंतूर आगारातून बस तत्काळ उपलब्ध होणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांनी दिली.सध्या या योजना बाबत आगार व्यवस्थापक मोठ्या प्रमाणावर जनजागृती करताना दिसून येत आहे.

या योजनेसाठी एसटी आगारांनी आपल्या ताफ्यातील नव्या सुरक्षित आरामदायी बस देण्याचा निर्णय घेतला असून सुरक्षित प्रवास या वर अधिक भर दिला आहे.

तीर्थाटन योजना ज्येष्ठ नागरिक महिला व इतरांसाठी अमृत महोत्सव योजनेअंतर्गत ७५ वर्षांवरील जेष्ठांना मोफत प्रवास करता येईल मोफत प्रवास करता येईल तसेच महिला सन्मान योजनेअंतर्गत ५० टक्के सवलत तसेच इतर सामाजिक सवलतीही जशाच्या तशा लागू राहणार असून तीर्थाटन योजनेअंतर्गत बस उपलब्ध व्हावी यासाठी आगार प्रमुखाकडे मागणी करता येईल असे कळविण्यात आलेले आहे.

एसटी संगे तीर्थाटन २३ जानेवारी २०२६ पासून ही योजना राज्यातील २५१ आगारात एकाच वेळी राबविण्यात येत असून जिंतूर आगाराचा समावेश आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार प्रत्येक आगारातून किमान पाच बसेस या योजनेसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने तीर्थक्षेत्र दर्शन करणे आता सवलतीच्या दरात सोयीचे होणार आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू -** शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## अग्रलेख...

# विकसित भारताचा अर्थसंकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नाला गती देणारा अर्थसंकल्प असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी रविवारी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे वर्णन करावे लागेल. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा तिसरा अर्थसंकल्प विकासाला चालना देणारा आणि ऐतिहासिक असा आहे. पंतप्रधान मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे या अर्थसंकल्पात अपार संधी आहेत, विकसित भारताच्या उड्डाणाचा तो राजमार्ग आहे, यात शंका नाही. निवडणुकीचे वर्ष नसल्यामुळे २०२६-२७ या वर्षीचा अर्थसंकल्प लोकप्रिय राहणार नाही, हे आधीच स्पष्ट झाले होते. आता परंपरेप्रमाणे सत्ताधारी पक्षाचे सदस्य या अर्थसंकल्पाचे तोंड भरून कौतुक करतील, तर विरोधी पक्षांचे सदस्य त्यावर तुटून पडतील. सामान्यपणे कोणताही अर्थसंकल्प सत्ताधारी पक्षाचे सदस्य जेवढे कौतुक करतात, तेवढा चांगला नसतो आणि विरोधी पक्षांचे सदस्य ज्या त्वेषाने टीका करतात, तेवढा वाईटही नसतो. तुम्ही डोळ्यावर जसा चष्मा घालाल, तसा अर्थसंकल्प तुम्हाला दिसत असतो. त्यामुळे विरोधी पक्षांच्या सदस्यांना निराशाजनक, लोकविरोधी वाटणारा अर्थसंकल्प सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना विकासाला चालना देणारा वाटत असतो.

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात आयकराची मर्यादा १२ लाख रुपये करण्यात आल्यामुळे यावर्षी पगारदार वर्ग आणि मध्यमवर्गीयांच्या पदरात काही पडणार नाही, हे सांगायला ज्योतिष्याची गरज नव्हती. पगारदार वर्ग तसेच मध्यमवर्गाचे संपूर्ण लक्ष आयकराची मर्यादा किती वाढवली, यावरच केंद्रित असते, त्यात गैरही काही नसते. गुरुवारी संसदेत सादर करण्यात आलेल्या आर्थिक अहवालातून यंदाचा अर्थसंकल्प कसा राहणार, याची कल्पना आली होती. या अर्थसंकल्पाने निराशा केली नाही. अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारामन् यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा नववा आहे. आपल्या देशात अन्य अनेक खाती महिला मंत्र्यांनी भूषवली, पण अर्थखाते भूषवणाऱ्या सीतारामन् या पहिल्याच आहेत. नववा अर्थसंकल्प संसदेत सादर करत त्यांनी नऊ अर्थसंकल्प सादर करणाऱ्या काँग्रेसच्या पी. चिदम्बरम यांची बरोबरी केली आहे. पुढील वर्षी म्हणजे २०२७ मध्ये अर्थसंकल्प सादर करत सीतारामन् सर्वाधिक म्हणजे दहावेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री मोरारजी देसाई यांची बरोबरी करतील. २०२८ चा म्हणजे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधीचा अर्थसंकल्प सादर करत सीतारामन् देशात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणाचा विक्रम करतील. यात शंका नाही.

अर्थमंत्री मग तो राज्यातील असो की केंद्रातील, तो फारसा लोकप्रिय कधीच नसतो. अर्थमंत्र्याने लोकप्रिय होण्याचा प्रयत्न केला तर देशाच्या अर्थव्यवस्थेचे वाटोळे व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे अर्थमंत्र्याने कठोरच राहायला पाहिजे. आई मुलांचे सतत लाड करू शकते, पण वडिलांना तसे करता येत नाही. अर्थमंत्री हा मुलांना शिस्त आणि चांगले वळण लागावे म्हणून सतत रागावणाऱ्या वडिलांसारखा असतो. कारण तो मुलाच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करत असतो. अर्थमंत्र्याची स्थिती यापेक्षा वेगळी नसते. त्याला देशाचे उत्पन्न आणि खर्च यांची सांगड घालावी लागते. अंथरूण पाहून पाय पसरावे, अशी एक म्हण आहे. अर्थमंत्र्याला या म्हणीला सतत जागावे लागते. त्याला आजचा नाही तर उद्याचा विचार करावा लागतो. अर्थमंत्री हा जसा काटकसर करणारा असावा तसाच तो उधळपट्टी करणाराही नसावा. पण आवश्यक तेथे त्याने पैसा देताना आपला हात कधीच आखडता घेऊ नये, अशी त्याच्याकडून अपेक्षा असते. निर्मला सीतारामन् या कसोटीवर उतरल्या आहेत. देशातील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देताना त्यांनी गोरगरीब जनतेच्या कल्याणाकडेही आपले दुर्लक्ष होऊ दिले नाही. अर्थसंकल्पातून त्यांनी संतुलन साधले आहे.

भारत ही जगातील सर्वांत वेगवान अर्थव्यवस्था आहे. सध्या भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असली तरी लवकरच जगातील तिसऱ्या अर्थव्यवस्थेच्या पायदानावर आपण उभे होणार आहे. सीतारामन् यांचा अर्थसंकल्प हा या दिशेने वाटचाल करणारा आहे. कोट्यवधी भारतीयांनी विकसित भारताचे जे स्वप्न पाहिले, ते साकार करण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पातून आश्वासक असे पहिले पाऊल टाकले आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला आणि सर्वसामान्य जनतेसाठी अनेक भरीव उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. संतुलित विकासाचा पाया या अर्थसंकल्पातून घालण्यात आला आहे. आयकराच्या मर्यादेत वाढ झाली नसली तरी अन्य मार्गाने पगारदारवर्गाला दिलासा देण्यात आला आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. आत्मनिर्भर आणि विकसित भारत हा मोदी सरकारच्या दृष्टीने निव्वळ नारा नाही तर संकल्प आहे आणि त्या संकल्पाची पूर्ती करण्याच्या दृष्टीने अनेक पावले या अर्थसंकल्पातून उचलण्यात आली आहेत. सीतारामन् यांनी अर्थसंकल्पातून उत्पादन क्षेत्र, पायाभूत सुविधा, ग्रामीण विकास, आरोग्य क्षेत्र आणि पर्यटन क्षेत्राला स्पर्श केला आहे. महागाई कमी करण्यासोबत रोजगार वाढवण्याला प्राधान्य दिले आहे. मोदी सरकारची वाटचाल पहिल्या दिवसापासूनच एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय या धोरणानुसार सुरू आहे. समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण म्हणजे अंत्योदय. मोदी सरकारचे मागील १२ वर्षांतील सर्व अर्थसंकल्प समाजातील शेवटच्या माणसाच्या कल्याणाचे नुसते स्वप्न पाहणारे नाही तर त्याची पूर्तता करणारे होते. निर्मला सीतारामन् यांनी संसदेत रविवारी सादर केलेला अर्थसंकल्प हा याच भूमिकेचा परिचायक म्हणावा लागेल. समाजातील शेवटचा माणूस गोरगरीब, शोषित, पीडित, वंचित आणि दलित वर्गातील असतो, त्यामुळे या वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात अनेक उपाययोजना केल्या.

काही वर्षांपूर्वी रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प मांडला जात होता, पण मोदी सरकारने ही प्रथा बंद केली आणि मूळ अर्थसंकल्पातच रेल्वेचा अर्थसंकल्प समाविष्ट केला. या अर्थसंकल्पात सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर सुरू करण्याची घोषणा आहे. अर्थमंत्र्याला देशातील कोणत्याही एका राज्याचा विचार करून चालत नाही, त्याला देशातील सर्व राज्यांचा सारखा विचार करावा लागतो. ज्याप्रमाणे आई-वडिलांना सर्व मुले सारखी असतात, कोणा एका मुलावर त्यांचे प्रेम नसते, तशीच स्थिती अर्थमंत्र्याची असते. त्याच्यासाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश हे मुलासारखे असतात. त्याला एका राज्याला झुकते माप देताना दुसऱ्या राज्यावर अन्याय करता येत नाही. भेदभावविरहित समन्यायी विकासाच्या तत्त्वाचे त्याला पालन करावे लागते. त्याचेच दर्शन यंदाच्या अर्थसंकल्पातून सीतारामन् यांनी घडवले आहे.

मोदी सरकारच्या आतापर्यंतच्या सर्व अर्थसंकल्पाचे आत्मनिर्भर भारत हे समान सूत्र आहे. 'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे. त्यामुळे अर्थसंकल्पातूनही या धोरणाचे प्रतिबिंब उमटणे स्वाभाविक म्हणावे लागेल. जगातील अस्थिर राजकीय परिस्थितीत संरक्षणासाठी तरतुदीत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे, ज्याची खरोखर आवश्यकता होती. आरोग्य आणि शिक्षण या दोन प्रमुख क्षेत्रांसाठीही सीतारामन् यांनी भरीव तरतूद केली आहे. नरेंद्र मोदींसारखा दूरदृष्टीचा पंतप्रधान आणि निर्मला सीतारामन् यांच्यासारखी संवेदनशील अर्थमंत्री ज्या देशात आहे, त्या देशाला विश्वगुरू होण्यापासून कोणी रोखू शकत नाही. जगातील कोणतीही ताकद भारताचे विश्वगुरू हे पद हिरावून घेऊ शकत नाही. प्राचीन भारतीय संस्कृती, समृद्ध वारसा आणि वसुधैव कुटुंबकम् ही वृत्ती यामुळे भारत कालही महान होता, आजही महान आहे आणि उद्याही महान राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प भारताचे मोठेपण दर्शवणारा आहे. त्यामुळेच सीतारामन् यांच्या अर्थसंकल्पात अर्थ आहे आणि विकसित भारताचा संकल्पही आहे, असे म्हटले तर ते अनाठायी ठरू नये. ▮

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी


# पाक-बांगलादेश एकीकरण?

५५ वर्षांपूर्वी - १९७१ च्या डिसेंबर महिन्यात पाकिस्तानचे दोन तुकडे करण्यात आले. पाकिस्तान आणि बांगलादेश. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी फार दूरवरचा विचार करून पाकिस्तानचे दोन भाग करण्याचा निर्णय घेतला होता. ५५ वर्षांनंतर २०२६ मध्ये सुरू झालेला घटनाक्रम पाहता आता हे 'दोन तुकडे' पुन्हा एकत्र येतील काय, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**पूर्व आणि पश्चिम** : १९४७ मध्ये पाकिस्तान अस्तित्वात आल्यापासून पूर्व व पश्चिम पाकिस्तानात फारसे सख्य नव्हते. पूर्व पाकिस्तानवर बंगाली संस्कृतीचा पगडा होता, तर पश्चिम पाकिस्तानवर पंजाबी संस्कृतीने आपली जरब बसविली होती. यातूनच पश्चिम पाकिस्तानातील लष्करी अधिकारी पूर्व पाकिस्तानला 'गुलाम' म्हणून वागवीत असत. त्यातून पूर्व पाकिस्तानी जनतेत एक प्रकारचा असंतोष तयार झाला व त्याची परिणती शेख मुजीबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली 'मुक्ती बाहिनीने' सशस्त्र आंदोलन करण्यात झाली आणि या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी घेतला होता. हे युद्ध सुरू करण्यापूर्वी इंदिरा गांधींनी दोन निर्णय घेतले होते. चीन तटस्थ राहील, तो यात पडणार नाही, असे आश्वासन त्यांनी मिळविले होते आणि दुसरीकडे अमेरिकेने पाकिस्तानला मदत केल्यास तत्कालीन सोवियत युनियन भारताच्या मदतीला धावून येईल, असा शब्द या देशाचे सर्वेसर्वा लिवोनिद ब्रेझनेव्ह यांनी इंदिरा गांधींना दिला होता. ठरल्याप्रमाणे, चीन तटस्थ राहिला आणि अमेरिकाही त्यात पडली नाही. काही दिवसांतच युद्ध संपले, पण पाकिस्तानचे दोन तुकडे करून नवा देश - बांगलादेश भारताचा मित्र झाला. मागील तीन वर्षांत मात्र बांगलादेशचे चित्र बदलले आहे.

**चीन आणि आयएसआय** : बांगलादेशला भारतापासून वेगळे करण्यात चीन व आयएसआय यांची निर्णायक भूमिका राहिली आहे आणि आता पाकिस्तान-बांगलादेश सरत्या दिवसागणिक जवळ येत आहेत. यांची ही जवळीक येणाऱ्या महिन्यांत नाही तर काही वर्षांत दोन्ही देशांच्या एकीकरणात बदलेल काय, असा प्रश्न आताच विचारला जाऊ लागला आहे. दोन्ही देशांमधील व्यापार वाढला आहे. शिष्टमंडळांची आवक-जावक वाढली आहे. आता तर बांगलादेशने पाकिस्तानकडून लढाऊ विमाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**समान धागा** : दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोवियत युनियन यांनी जर्मनीचे विभाजन केले. पश्चिम जर्मनी लोकशाहीवादी झाली तर पूर्व जर्मनीवर कम्युनिस्ट शासन राहिले. केवळ देशाचे नाही तर बर्लिन शहराचेही विभाजन करण्यात आले. बर्लिन भिंत अस्तित्वात आली. पण, जनमताचा रेटा एवढा जबर होता की बर्लिन भिंत कोसळून पडली आणि दोन्ही देशांचे एकीकरण झाले. कारण, दोन्ही देशांना जोडणारा महत्त्वाचा दुवा होता- ख्रिश्चन धर्म!



**इस्लामसाठी** : आणि नेमका 'धर्म' हाच धागा पाकिस्तान आणि बांगलादेश यांना जवळ आणत आहे. दोन्ही देशांतील जनतेची बोली भाषा, पीक-पाणी या वेगळ्या असल्या तरी त्यांना जोडणारा दुवा एकच आहे, तो म्हणजे इस्लाम आणि भारताचा विरोध. विशेषतः हिंदुविरोध. बांगलादेशात सतत हिंदूंवर हल्ले केले जात आहेत. एकप्रकारे हिंदूंना जगणे अवघड करण्यात आले आहे. हे सारे एका योजनेनुसार केले जात असल्याचे मानले जाते. हिंदूंवर हल्ले केल्याने भारत-बांगलादेश संबंधात तणाव, तेढ निर्माण होईल, हे गृहीत धरून नेमके ते घडवून आणण्यासाठी हिंदूंना लक्ष्य केले जात आहे आणि बांगलादेश सरकारने यात बघ्याची भूमिका घेतली आहे.

**आता क्रिकेट** : बांगलादेश सरकारने आपल्या क्रिकेट मंडळास भारतात होणाऱ्या टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी आपला संघ न पाठविण्याचा आदेश दिला आहे. भारताशी असलेले सर्व प्रकारचे संबंध हळूहळू तोडण्याचा प्रयत्न बांगलादेश सरकारने सुरू केला आहे. याने पाकिस्तान सरकार सुखावले आहे.

**विभाजनाची सल** : पाकिस्तानी लष्करामध्ये १९७१ च्या पाकिस्तानी विभाजनाची सल आहे. १९७१ चा बदला म्हणूनच पाकिस्तानने 'ऑपरेशन टोपाक' नावाने काश्मीरला रक्तबंबाळ करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशातून शेख हसीना सरकारचे पतन झाल्यापासून पाकिस्तानने बांगलादेशला आपल्याकडे ओढण्याची मोहीम चालविली आहे. मग, ही 'मोहीम' मध्येच कशी थांबविली जाईल? या मोहिमेचा अंतिम थांबा पाकिस्तान-बांगलादेशचे विलीनीकरण असेल असे म्हटले जाते.

**काही अडसर** : दोन्ही देशांचे एकीकरण करण्याचा जोरदार प्रयत्न पाकिस्तान लष्कर करणार असले तरी त्यातील सर्वांत मोठा अडसर बांगलादेशचे लष्कर राहणार आहे. बांगलादेश लष्कराला आपले अस्तित्व कायम ठेवायचे आहे. पाकिस्तानी लष्कराची 'दादागिरी' त्यांना चांगली ठावूक आहे. दोन्ही देशांचे विलिनीकरण झाल्यास त्याचा पहिला फटका आपल्याला बसेल याची बांगलादेश लष्कराला पूर्ण जाणीव आहे.

**दुसरा अडसर** : बांगलादेशातील प्रसार माध्यमे पाकिस्तानला फारशी अनुकूल नाहीत. या माध्यमांवर बंगाली संस्कृतीचा, साहित्याचा आजही प्रभाव आहे. त्यांना सरळसरळ पाकिस्तानात विलीन होणे मान्य नाही.

**चीनची भूमिका** : पाकिस्तान-बांगलादेश संबंधात चीन नेमकी कोणती भूमिका घेतो हे निर्णायक राहणार आहे. आता हे दोन्ही देश एकप्रकारे चीनचे मांडलिक देश झाले आहेत. चीन आणि अमेरिका यांनी ठरविल्यास दोन्ही देशांच्या एकीकरणास फार वेळ लागणार नाही. सध्यातरी दोन्ही देशांची अर्थव्यवस्था चीन-अमेरिकेच्या आर्थिक मदतीवर अवलंबून आहे.

**एकी तर झालीच** : पाकिस्तान-बांगलादेशचे एकीकरण होईल काय, झाल्यास ते केव्हा होईल, या प्रश्नांची उत्तरे आज देणे अवघड असले तरी दोन्ही देशांत एकी मात्र झालेली आहे. अनेक बाबतीत ते संयुक्तपणे निर्णय घेऊ लागले आहेत. लष्करी करारांची देवाणघेवाण सुरू झाली आहे. बांगलादेश पाकिस्तानकडून लढाऊ विमाने खरेदी करणार आहे! ती कुणाविरुद्ध वापरण्यासाठी? अर्थातच भारताच्या विरोधात याचा वापर होण्याची शक्यता आहे.

**पाकिस्तानचा फायदा** : पाकिस्तान-बांगलादेश यांचे एकीकरण झाल्यास त्याचे काय परिणाम असतील याचा ताळेबंद मांडला जाऊ लागला आहे. पाकिस्तानच्या तुलनेत बांगलादेशने मागील ५० वर्षांत चांगली प्रगती केली. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांनी बांगलादेशच्या प्रगतीचे भरभरून कौतुक केले आहे. पाकिस्तान-बांगलादेशचे एकीकरण झाल्यास, त्याचा पाकिस्तानला चांगला फायदा होईल असे मानले जाते. पाकिस्तानात सध्या 'औरंगजेब' युग सुरू आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. औरंगजेब यांना अर्थमंत्री करण्यात आल्यापासून त्यांनी आर्थिक सुधारणांचा धडाका लावला आहे. खाजगीकरणाचे वारे पाकिस्तानातही वाहू लागले आहेत. यास बांगलादेश जोड मिळाल्यास पाकिस्तान 'बिमारू' अवस्थेतून बाहेर येईल असे मानले जाते.

**मोठे मुस्लिम राष्ट्र** : इंडोनेशिया हा जगातील सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेला देश मानला जातो. जवळपास २८ कोटी मुस्लिम या देशात आहेत. पाकिस्तान-बांगला देश याचे एकीकरण झाल्यास तो सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असणारा देश ठरेल. पाकिस्तानची लोकसंख्या आजच २५ कोटींच्या घरात, तर बांगलादेशची लोकसंख्या १७ कोटींच्या जवळपास आहे. म्हणजे एकीकृत पाकिस्तानची लोकसंख्या ४२ कोटींच्या घरात जाईल. आज भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. भारतानंतर चीनचा क्रमांक लागतो. पाकिस्तान-बांगलादेश यांची संयुक्त लोकसंख्या विचारात घेतल्यास हा देश तिसऱ्या क्रमांकावर असेल, त्याचे भौगोलिक आकारमान वाढलेले असेल. याचा भारतावर होणारा सरळ परिणाम म्हणजे भारताच्या पूर्व-पश्चिम या दोन्ही सीमा संवेदनशील होतील. म्हणजेच भारताला आपल्या संरक्षणखर्चात मोठी वाढ करावी लागेल. भारताला यासाठी बाध्य करण्यासाठी चीन, पाकिस्तान-बांगलादेश एकीकरणाला आशीर्वाद देऊ शकतो. दोन्ही देशांचे एकीकरण, विलीनीकरण आज दृष्टिपथात दिसत नसले तरी दोन्ही देशांमध्ये सुरू झालेले सहकार्याचे युग मात्र निश्चितच 'दृष्ट' लागण्यासारखे आहे. ▮

## वेध

हेमंत सालोडकर

# सुनेत्रा पवारांच्या निमित्ताने...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. अजित पवार यांच्यावर अन्त्यसंस्कार झाला आणि लगेच त्यांच्या जागी पक्षाचे नेतृत्व कोण करणार अशी चर्चा सुरू झाली. काळ आणि वेळ कुणासाठी थांबत नाही असे म्हणतात. काळ जसा पुढे जातो, तसे दुःख विसरावे लागते, तसेच राष्ट्रवादी काँग्रसमध्ये झाले. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना जबाबदारी स्वीकारावी लागली आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना नेतृत्व मिळाले. अजित पवारांबाबत अशी दुर्दैवी घटना घडून आपल्याला पक्षाचे नेतृत्व करावे लागेल, असे स्वप्नातही सुनेत्रा पवार यांना वाटले नसेल. पण दुःख सहन करून त्यांनी पक्षाचे नेतृत्व स्वीकारले आणि उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या.

यापूर्वीही देशातील आणि पुरोगामी म्हणून ओळख असलेल्या महाराष्ट्रातील अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत स्वतःचे नाव उंचावले आहे. राजकारणातही महिलांनी सर्वोच्च पदे भूषविली आहेत आणि आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. भारताने वेळोवेळी अशा प्रभावशाली महिला राजकीय व्यक्ती पाहिल्या आहेत. त्यांच्या योजना आणि राजकीय वैशिष्ट्यांचे अनेकांनी कौतुक केले आहे. देशाच्या विकासात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. अनेक महिलांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रिपदाची जबाबादारी यशस्वीपणे सांभाळली. द्रौपदी मुर्मू या विद्यमान राष्ट्रपती आहेत. राजकारणाची सुरुवात अगदी नगरसेविका, आमदार, झारखंडच्या राज्यपाल आणि त्यानंतर राष्ट्रपती असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. यापूर्वी अमरावती जिल्ह्यातील प्रतिभाताई पाटील यांनी देशातील सर्वोच्च राष्ट्रपतिपद भूषवले. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या होत्या. त्यांनी राबविलेल्या अनेक योजना, घेतलेले धाडसी निर्णय लोकांनी पाहिले आहेत. सुचेता कृपलानी या एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि राजकारणी होत्या. भारतातील सर्वांत मोठे राज्य उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करणाऱ्या संविधान सभेचा भाग असलेल्या १५ महिलांमध्ये त्या होत्या. अरुणा असफ अली यांच्यासह अनेक महिला भारत छोडो आंदोलनात आघाडीवर होत्या. सोनिया गांधींसमोरही आकस्मिक स्थिती निर्माण झाली होती. बॉम्बस्फोटात राजीव गांधी यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले. भारतीय जनता पक्षाच्या कुशाग्र नेत्यांमध्ये सुषमा स्वराज यांचे नाव नेहमीच घेतले जाते. त्या नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या सरकारमध्ये भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री होत्या. इंदिरा गांधींनंतर हे पद भूषवणाऱ्या त्या दुसऱ्या महिला होत्या. त्या सात वेळा खासदार आणि तीन वेळा विधानसभेच्या सदस्य म्हणून निवडून आल्या. त्यांनी दिल्लीच्या यशस्वी मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. अशाच कर्तृत्ववान महिलांमध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, शीला दीक्षित, जयललिता, मायावती, रेखा गुप्ता, वसुंधरा राजे, सुप्रिया सुळे यांचा समावेश होतो. इतकेच काय तर देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी तर नवव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. देशाच्या तिजोरीची चावी महिलेच्या हाती असल्याचा अभिमान सर्व महिलांना आहेच. पौराणिक, इतिहास काळातही महिलांनी कर्तृत्व गाजविले आहे. त्यांनी अनेक संकटप्रसंगी देशाचे नेतृत्व केले आहे. महाराष्ट्रात डॉ. नीलम गोऱ्हे, पंकजा मुंडे, नवनीत राणा, पूनम महाजन, वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे यांनीही आपल्या कर्तृत्वाने महिलांचे नेतृत्व केले आहे. आता याच मालिकेत सुनेत्रा पवार यांना महाराष्ट्रात पक्षाचे आणि राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर संपूर्ण राज्य शोकाकुल आहे. अजितदादांची पोकळी कधीही भरून निघणार नाही, हे सत्य असले तरी काळ पुढे सरकत असतो. तसे आपल्यालाही त्याच्यासोबत चालावे लागते. राजकीय नेत्याला कुटुंब, पक्ष, समाजाचे नेतृत्व करायचे असते. आपले दुःख विसरून समाजाचे नेतृत्व करायचे असते. सुनेत्रा पवारांना राजकीय वारसा लाभला आहे. अजित पवारांचे राजकारण त्यांनी जवळून पाहिले आहे. त्यांची काम करण्याची पद्धत, निर्णयक्षमता, कार्यकर्त्यांना सांभाळणे, त्यांच्या समस्या, राजकीय डावपेच याचा अभ्यास त्यांना नक्कीच असणार. सुनेत्रा पवार या राज्यसभेच्या खासदार आहेत. त्यामुळे त्यांनी स्वीकारलेली उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी त्या व्यवस्थित पार पाडतील यात शंका नाही. ▮



९८५०७५३२८१

## कानोसा

अमोल पुसदकर

# आणखी किती दिवस असे चालणार?

उत्तर प्रदेशातील मिर्जापूर जिल्ह्यात जिम म्हणजे महिला व्यायामशाळेच्या नावाखाली महिलांना एकत्र करणे, कॅमेऱ्याद्वारे त्यांच्या आक्षेपार्ह चित्रफीत बनविणे, त्याच्या आधारावर त्यांच्याकडून पैसे उकळणे व धर्मांतरणासाठी दबाव टाकणे, अत्याचार आणि शोषण करणे इत्यादी आरोप इम्रान खान नावाच्या आरोपीवर आहेत. इतके सर्व होऊन ५० पैकी केवळ एक महिला पोलिसात तक्रार करण्याची हिंमत दाखवते. ही सर्वच परिस्थिती चिंताजनक आहे. दुसरी घटना उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथे पाच मुस्लिम मुलींनी एका हिंदू मुलीला बळजबरीने बुरखा घालायला लावला. त्या केरळ फाईल चित्रपटाप्रमाणे तिच्यावर धर्मांतरित होण्यासाठी दबाव टाकत होत्या. त्यांच्यावरही गुन्हा दाखल झालेला आहे. तिसरी घटना वाशीम जिल्ह्यात समोर आली आहे, ज्यामध्ये एका विवाहित शाहरुख नावाच्या तरुणाने अल्पवयीन मुलीला लग्नासाठी दबाव टाकल्याचे समोर आलेले आहे. या सर्व प्रकाशित घटना आहेत, परंतु अप्रकाशित घटनांचे काय? त्या सुद्धा भरपूर आहेत.

बरेचदा अशा घटना पोलिसांकडे येत नाहीत कारण अशा प्रकरणात बळी ठरलेल्या ज्या महिला असतात, त्यांना आपल्या बदनामीची भीती वाटत असते. अनेक वेळा हे आरोपी ज्या धर्माचे आहेत, त्यांच्या गुन्हेगारी पृष्ठभूमीमुळे सुद्धा अनेक महिलांना असे प्रकरण पोलिसांपर्यंत नेण्याची भीती वाटत असते. बरेचदा या गुंड लोकांकडून त्यांना त्यांच्या घरच्यांना जीवे मारण्याच्या किंवा दुखापत करण्याच्या धमक्या दिल्या गेलेल्या असतात.

अशाच एका घटनेमध्ये एक महिला आपले गाव सोडून नागपुरात राहिली, परंतु तेथे आरोपी व आरोपीचा वडील हे दोघेही आले व त्यांनी सुद्धा अत्याचार केला. अशा वेळेस कायद्याचे राज्य कुठे आहे, असा प्रश्न पीडितांना पडत असावा. समाज माध्यमांवर नाव बदलून, आपला धर्म लपवून मैत्री करणाऱ्यांची व त्यातून गुन्हे घडविणाऱ्यांची संख्या सुद्धा काही कमी नाही. अशा सर्व प्रकरणांमध्ये सर्वसामान्य समाज अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचतो आणि त्यावर दुःख व्यक्त करीत आपल्या कामाला लागतो, पण असे सर्व किती दिवस चालणार हा मात्र प्रश्न आहे.

महानगर असो वा ग्रामीण भाग अशा सर्व ठिकाणी यांच्या कारवाया सुरू असतात. यांचा उद्देश हा केवळ गुंडगिरी आणि दहशत माजवणे हा नाही, तर हिंदू महिलांचा अपमान करणे, त्यांना त्रास देणे हा सुद्धा आहे. त्यांचा हा पक्का समज असतो की आपल्या येथील न्यायव्यवस्था, पोलिस प्रशासन माझे काही बिघडवू शकत नाही. अत्याचाराच्या कुठल्याही प्रकरणात शिक्षा झाल्यास दोन-चार-दहा वर्ष तुरुंगामध्ये काढण्याची त्यांची तयारी असते. त्यांच्या समाजामध्ये अशा आरोपींना वाईट समजले जात नाही, त्यामुळे त्यांची हिंमत आणखी वाढलेली असते. त्यांचा समाज त्यांना शाबासकी देतो. त्यांच्या समाजातील महिला या सुद्धा हिंदू समाजातील गरजू महिलांना हेरून त्याही अशा लोकांना मदतच करीत असतात. मग हिंदू समाजाचे काय? अशा महिलांना धीर देण्याचे कार्य कोणीतरी करायलाच पाहिजे. त्यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे कार्य सुद्धा केले पाहिजे. हुंडाबळीच्या विरोधात किंवा महिला अत्याचाराच्या इतर घटनांमध्ये जसे मोर्चे निघतात, पोलिसांना निवेदन दिले जाते, जनक्षोभ उसळतो, असे या प्रकरणांमध्ये कधीच दिसत नाही. कदाचित या धर्मातील लोकांची दहशत याला कारणीभूत असू शकते.

पाकिस्तानमध्ये नेहमीच असे प्रकार घडतात की तिथल्या हिंदू मुलींना उचलून नेण्यात आले, त्यांचे धर्मांतरण करण्यात आले. बांगलादेशमध्ये पण असे प्रकार घडत असतात. परंतु हिंदुस्थानामध्ये असे प्रकार घडावे ही लज्जास्पद गोष्ट नव्हे का? हिंदूंच्या हिंदुस्थानामध्ये आम्ही अशा घटना का खपवून घेतो? कुठल्या हिंदुत्ववादी पक्षाच्या, संघटनांच्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना अशा घटनांच्या विरोधात नेतृत्व करावे, समाजाला एकत्रित करावे, त्याचे प्रबोधन करावे, अशा घटना घडू नये यासाठी काय करता येईल याचा विचार करावा असे का वाटत नसावे?

या संदर्भात एक अत्यंत दहशत निर्माण करणारी घटना एका महिलेने मला सांगितली. त्या म्हणाल्या की, ज्यावेळेस त्या कॉलेजमध्ये शिकत होत्या, त्यावेळेस त्या अशाच एका गुन्हेगारी आणि दहशतीत अग्रेसर असणाऱ्या धर्माच्या लोकांच्या वस्तीमध्ये राहत होत्या. त्या जेव्हा कॉलेजला निघायच्या त्यावेळेस गुंड तरुणांचे टोळके त्यांच्या घरापासून तर वस्ती संपतपर्यंत त्यांच्या मागे मागे शिव्या आणि धमक्या देत चालायचे. पुन्हा कॉलेजमधून येताना तसाच प्रकार चालायचा. हा प्रकार त्या ज्या काकांच्या घरी राहायच्या त्यांना सांगायच्या. त्यावर त्यांची काकू त्यांना म्हणायची की, तू सुंदर असल्यामुळे तुझ्या मागे ते लागत असतील. अशा प्रकारे एक वर्ष संपले. एक दिवस सकाळी त्यांनी सडा टाकण्यासाठी दार उघडले तर त्यांना धक्का बसला, कारण त्यांच्या दारासमोर एका माणसाचा मृतदेह पडलेला होता. त्यांचे संपूर्ण कुटुंब भयग्रस्त झाले. त्या नेहमीप्रमाणे महाविद्यालयात जायला निघाल्या तेव्हा त्यांच्या मागे मागे जाणाऱ्या टोळक्यातील एका तरुणाने त्यांना सांगितले की, याला मी मारून तुझ्या दारासमोर फेकलेले आहे. एक दिवस तुझ्या काकालाही असेच मारून टाकील. त्यांनी ही गोष्ट आपल्या घरी सांगितली. यावर त्यांच्या काकूने तिचे तात्काळ लग्न करून टाका असे फर्मान सोडले. शेवटी त्यांचे महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाला शिकत असताना लग्न झाले. हे असे किती दिवस चालणार? हिंदूंच्याच देशांमध्ये हिंदूंना तारणहाराची आवश्यकता भासावी हे अतिशय लज्जास्पद आहे. जगन्नाथ पुरीचे शंकराचार्य म्हणाले होते की, ज्यांचा जन्म हिंदू रक्षणासाठी झालेला आहे ते त्यांचे कार्य आज विसरले आहेत का? समाजाने अशा सगळ्या घटनांना बिलकूल सहन करू नये. पोलिस, प्रशासन, राजकीय नेते, हिंदू संघटना या सर्वांवरच समाजाचा दबाव असणे आवश्यक आहे.

''अगणित सीताये अपहृत है, महावीर निजको पहिचानो. अपमानित दृपदाए कितनी समरधीर शरको संधानो'' असे म्हणण्याची आवश्यकता आहे. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### जग खूप सुंदर आहे, फक्त नीट जगता यायला हवं

परमेश्वराने निर्माण केलेले हे जग खूप सुंदर आहे. मानवाला उत्तम जीवन जगता यावं या उद्देशाने देवाने इथली प्रत्येक गोष्ट डिझाईन केलेली आहे. जेणेकरून माणूस आपलं जीवन आनंदाने शंभर वर्षापर्यंत समाधानाने जगू शकेल, एवढे परिपूर्ण आहे. माणसाला जीवन जगायला या जगाइतके दुसरे सुंदर स्थान ब्रह्मांडात असू शकत नाही. विश्वास बसत नसेल तर, मानवी जीवन जगायला दुसरे उत्तम स्थान आहे काय? याचा शोध घ्यायला आजपासून सुरुवात करा आणि असं एक नवीन जग शोधून काढा, जिथे असेल सर्व काही छान- छान ,अगदी तुमच्या मनासारखं तुम्हाला हवं तसं. जिथे स्पर्धा नसेल, वादविवाद नसेल, संघर्ष नसेल, शत्रू नाही, अपमान नाही, राजकारण नाही, टीकाकार नाही, ईर्ष्या नाही, भेदभाव, द्वेष, मत्सर नाही, सर्व कसं अगदी तुम्हाला हवं तसं, फक्त तुम्ही आणि तुमचे आनंदी जग. अशा स्वप्नवत जगात तुम्हाला जीवन जगायला आवडेल का? सखोल विचारांती तुमचं उत्तर असेल, नाही. कारण, संघर्षाशिवाय मानवजीवन असूच शकत नाही आणि असेल तर ते जीवन नसेल. एवढं मात्र खरं. आज प्रत्येक घडीला, हे जग फार वाईट आहे, कुणी कुणाचं नाही, हे जग दुःखालय आहे, अशी वाक्ये कोणत्या तरी दिशेने, कुणाच्यातरी मुखातून आपल्या कानावर आदळत असतात आणि हेच पूर्ण सत्य माणून, जगाविषयी आपण चुकीचा भ्रम निर्माण करून जीवनाकडे बघत असतो. पण प्रत्यक्षात मात्र हे जग मानवासाठी परिपूर्ण आहे. या जगात माणसाने निसर्ग नियमानुसार प्रामाणिकपणे जगायला सुरुवात केली तर हे जग अधिक सुंदर दिसेल व जगणंही आनंदी होईल. परमेश्वराने आपल्याला येथे जीवन जगायला पाठवले आहे. ज्या ज्या गोष्टी परमेश्वराने निर्माण केल्या आहेत त्या वाईट असूच शकत नाही. कारण ब्रह्मांडातील दिव्य शक्ती, मानवाच्या आणि पृथ्वीच्या हितासाठी सदैव कार्यरत असतात. म्हणून ज्या जगात, ज्या देशात, ज्या धर्मात, ज्या कुळात आपला जन्म झाला आहे तेच आपल्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. आपण जसे आहोत, जिथे आहोत तिथेच छान आहोत. मी या जगाला माझ्यातलं सर्वोत्तम काय देऊ शकतो, जेणेकरून माझ्यामुळे हे जग अधिक सुंदर होईल आणि इतरांनाही सुंदर वाटेल.

**विजय इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

## वाचक पत्रे

### गिग कामगारांचे उत्पन्न आणि निवृत्तिवेतनधारक

संसदेत नुकत्याच सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार गिग कामगारांचे मासिक उत्पन्न १५ हजारांपेक्षा कमी असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. भारतात सुमारे ४० टक्के गिग कामगार असल्याचे सांगण्यात आले. यात वाढ करण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. गिग कामगारांचे काम मेहनतीचे आहे. घरोघरी जाऊन गरजू वस्तूंचा पुरवठा हे कामगार करीत आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याची गरज आहे जेणेकरून ते आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या पद्धतीने पार पाडू शकतील. याचबरोबर ईपीएस ९५ अंतर्गत निवृत्ती वेतन प्राप्त करणाऱ्यांची चिंता केंद्र सरकारने करायला हवी. गिग कामगारांना किमान मासिक १५ हजारापर्यंत किमान उत्पन्न मिळत आहे. पण ज्यांनी सरकारी/निम सरकारी, खाजगी सेवेत आपल्या आयुष्याची ३० ते ४० वर्षे घालविली आणि प्रामाणिकपणे देशाच्या विकासात योगदान दिले, त्यांना त्यांच्या सरत्या आयुष्यात वार्षिक १२ हजार आणि काहींना त्यापेक्षाही कमी उत्पन्न मिळतं ही वस्तुस्थिती सरकार नजरेआड का करीत आहे हे न उलगडणारे कोडे आहे. सप्टेंबर २०१४ पासून निवृत्ती वेतनात वाढ झालेली नाही. आशेवर जगणाऱ्यांपैकी काहींनी मधल्या काळात अखेरचा श्वास घेतला पण केंद्र सरकारला पाझर फुटला नाही. या गंभीर विषयाकडे केंद्र सरकारने सहानुभूतीच्या नजरेतून बघावे, ही माफक अपेक्षा आहे.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

### संसारातून परमार्थाकडे नेणारे श्रीशैल्य गमन...

श्री नृसिंह सरस्वती महाराज हे दत्तसंप्रदायातील द्वितीय अवतार मानले जातात. माघ वद्य प्रतिपदेला श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा श्रीशैल्य (कर्दळीवन) गमन दिवस साजरा केला जातो. हा दिवस गुरुप्रतिपदा म्हणूनही ओळखला जातो. गाणगापूर येथे २४ वर्षे वास्तव्य केल्यानंतर, तेथे आपल्या निर्गुण पादुका स्थापन करून या दिवशी स्वामींनी गाणगापूर सोडले आणि श्रीशैल्य पर्वत यात्रेला निघाले. दत्तसंप्रदायात हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. केवळ भौगोलिक प्रवास करणे हा या यात्रेचा उद्देश नव्हता तर, संसारातून परमार्थाकडे जाण्याचा गूढ आध्यात्मिक संदेश या गमनातून स्वामींनी दिला आहे. श्रीशैल्य येथे स्वामींनी दीर्घ तपश्चर्या केली आणि मौनव्रत धारण केले.

स्वामींचे संपूर्ण जीवन धर्म, वैराग्य, तपस्या आणि लोककल्याणासाठी समर्पित होते. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन श्री दत्त उपासनेचा व्यापक प्रसार केला. दत्त उपासनेचे महत्त्व त्यांनी जनमानसात खोलवर रुजवले. श्रीशैल्य गमनानंतर स्वामी महाराजांनी कर्दळीवनात गुप्त स्वरूपात आपले कार्य अखंडपणे चालू ठेवले. या दिवशी दत्तभक्त उपवास, जप, अभिषेक व दत्तनामस्मरण करतात. संसारातून परमार्थाकडे जाण्याचा आत्मबोध देणारा हा पवित्र दिवस आहे. ▮

**रेणुका हरदास**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# २५ हजारांची लाच स्वीकारताना अंबाजोगाईचे सहकार अधिकारी संतोष भंडारी एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ फेब्रुवारी**





येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील सहकार अधिकारी संतोष भंडारी यास २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने सोमवारी दुपारी रंगेहात पकडले. एका पतसंस्थेविरुद्धच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी भंडारी तक्रारा निकाली काढण्यासाठी भंडारी याने संबंधित संस्थेच्या सचिवाकडे ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यापैकी पहिला हप्ता स्वीकारताना ही मोठी कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित पतसंस्थेच्या विरोधात असलेल्या तक्रारींचे निवारण करण्याच्या बदल्यात भंडारी यांनी लाचेची मागणी केली होती. या प्रकरणी पतसंस्थेच्या सचिवांनी जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सोमवारी दुपारी अंबाजोगाई येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात सापळा रचला. लाचेच्या एकूण ५० हजार रुपयांपैकी २५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले होते. ही रक्कम स्वीकारताना पथकाने भंडारी यांना रंगेहात ताब्यात घेतले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून संतोष भंडारी याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून या प्रकरणातील अधिक तपशील तपासानंतर समोर येईल असे पथकाकडून सांगण्यात आले आहे.

# बीड येथे श्री गजानन महाराजाचा १४८ वा प्रकट दिन व रौप्य महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ फेब्रुवारी**

श्री क्षेत्र शेगाव निवासी संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रकट दिनानिमित्त तसेच श्री गजानन महाराज मंदिर, एकनाथ नगर, बीड येथे मंदिर व मूर्ती स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मंदिरात रौप्य महोत्सव वर्ष साजरे होत आहे दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा व श्री गजानन विजयग्रंथ पारायण आयोजित करण्यात आले आहे.



या धार्मिक सोहळ्याचा शुभारंभ रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी झालाअसून सांगता रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होईल. दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत श्री गजानन विजयग्रंथ पारायण तर दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. या कथांचे प्रवक्ते भागवताचार्य ह.भ.प. अंगद महाराज सातपुते (बीड) हे करणार आहेत.

श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन माघ शुद्ध सप्तमी, शके १९४७, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी असून त्या दिवशी विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वाजता श्रींचा अभिषेक, सकाळी १० वाजता भागवताचा गोकर्ण अध्याय, दुपारी १२ वाजता श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन सोहळा व महाआरती संपन्न होणार आहे. दुपारी १ वाजता श्रींची पालखी मिरवणूक भक्ती कन्स्ट्रक्शन परिसरातून काढण्यात येणार असून त्यानंतर लगेचच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १ फेब्रुवारी २०२६ पासून दररोज सकाळी ९ वाजता भाविकांना पारायणास बसता येणार आहे. या वर्षी मंदिर व मूर्ती स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होत असल्याने हा प्रकट दिन सोहळा विशेष महत्वाचा मानला जात असून भाविकांसाठी ही एक दुर्मिळ आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.

तरी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पवित्र भागवत सप्ताह, पारायण, प्रकट दिन सोहळा, पालखी मिरवणूक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे श्री गजानन महाराज मंदिर, एकनाथ नगर, बीड येथील विश्वस्त व आयोजकांच्या वतीने विनम्र आवाहन करण्यात आले आहे.

।। गण गण गणात बोते ।।
।। श्री गजानन महाराज की जय ।।

# प्रा.चंद्रकांत मुळे यांनी स्वीकारला सावरकर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ फेब्रुवारी**

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी प्रा. चंद्रकांत मुळे यांची नियुक्ती करण्यात आली असून आज त्यांनी आपला पदभार स्वीकारला.

विद्यासभेचे उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा. उमेश जगताप यांनी मुळे सरांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिस्तप्रिय आणि अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुळे सरांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.



रब्बी पिके जोमात आली असून गव्हाच्या पिकातील मोहरीचे पीक चांगले आहे. छाया–कृष्णा शिंदे

# माजलगाव क्रीडा संकुलाला अजित पवार यांचे नाव द्यावं– गोविंद टाकणखार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ फेब्रुवारी**



माजलगाव क्रीडा संकुलाचं काम काही दिवसात पूर्ण होत आहे. आमदार प्रकाशदादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांच्या पुढाकाराने युद्ध पातळीवर काम चालू आहे क्रीडा संकुलासाठी
अजितदादांनी खूप मदत केली आहे त्यांचं नाव माजलगाव शहरात सतत नजरेसमोर रहाव ही माजलगाव कडून अजितदादा पवार यांचा नाव द्यावं माजलगाव कराची मागणी आहे.

अजितदादांनी माजलगाव साठी झुकतं माप दिलं होतं, आमदार प्रकाशदादा सोळंके, जयसिंगभैय्या सोळंके हे सतत पाठपुरावा कुठलेही कामाचा करत असत. माजलगाव साठी लागणारा निधी अजितदादा कधीच नाकारत नव्हते. अजितदादा उपमुख्यमंत्री होते परंतु घराघरांमध्ये लहान मुलांच्या तोंडात फक्त अजितदादाच नाव असायचं. असा नेता भेटणं म्हणजे खूप भाग्य लागत, अजितदादा सारखा नेता महाराष्ट्राला लाभला हे आपले भाग्य आहे.

एकमेव नेता असा होता कुठलाही निर्णय घेतानी पूर्ण अभ्यास करूनच घेत होते आत्ता असा धाडसी नेता भेटन मुश्कील आहे. माजलगावकरांचं नाहीतर पूर्ण महाराष्ट्राचं नुकसान झालं आहे ते किती मोठे असले तरी आम्ही त्यांना विसरणार नाही. त्यामुळे माजलगावच्या क्रीडा संकुलाला अजितदादा पवार यांचाच नाव द्यावे ही खरी श्रद्धांजली ठरेल.

# किसान बाबा व नवनाथ बाबा सारखे संत कृपावंत असतात-ह.भ.प.गोविंद महाराज नाईकवाडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ फेब्रुवारी**

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांच्या २८ व्या वर्षाच्या सहाव्या पुण्यतिथी निमित्त मघ शुद्ध पौर्णिमे दिवशी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ह भ प गोविंद महाराज नाईकवाडे यांचे सुश्राव्य असे कीर्तन संपन्न झाले

आई वडील वेद देव हे व्यक्तीवर मर्यादित कृपा करतात आई वडील फक्त आपल्या मुलावर प्रेम करते व हे प्रेम मुलं आपल्याला सांभाळतील या हेतू करिता असते तसेच वेद हे ज्ञानग्रहण करणाऱ्या वर प्रेम करतात व देव हा फक्त आपल्या भक्तांवर प्रेम करतो राक्षसांना यमसाधनी पाठवण्याचं काम करतात परंतु संत हे अमर्याद प्रेम करतात भेदभाव न करता सर्वांवर अमर्याद प्रेम करणारे संत हे कृपावंत आहेत देव आई वडील व वेद कृपाशीला आहेत परंतु सर्वांवर प्रेम करणारे संत फक्त कृपावंत आहे गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज असे संत सर्वांवर कृपा करतात म्हणूनच संतांना कृपावंत म्हणतात असे किर्तन विवेचनामध्ये ह भ प गोविंद महाराज नाईकवाडे यांनी भावार्थ किसन बाबा महाराज २८व्या वर्षातील सहाव्या पुण्यतिथी कार्यक्रमात व्यक्त केला.

# बीड जिल्ह्याने पाहिलेले विकासाचे स्वप्न सुनेत्र ताईंच्या माध्यमातून पुर्ण होईल–अमरसिंह पंडित

## अजितदादांच्या आठवणी बीडकरांनी जागवल्या

### बीड येथे शोकाकुल वातावरणात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ फेब्रुवारी**

दोन दिवस झाले तरी दादा आपल्यात नाहीत असे मनाला पटत नाही दादांच्या जाण्याने बीड सह महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झालेले आहे. अजित दादांचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय इतिहास लिहिला जाऊ शकणार नाही. बीड जिल्ह्याच्या सामान्य जनतेने अजित दादा यांच्या माध्यमातून पाहिलेले विकासाचे स्वप्न उपमुख्यमंत्री सुनेत्राताईच्या माध्यमातून पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करत स्वर्गीय अजितदादांच्या आठवणींना माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी भावनिक उजाळा दिला. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार व अजित दादा प्रेमी मोठ्या संख्येने शोकसभेला उपस्थित होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक दु:खद निधनाच्या निमित्ताने बीड येथील रामकृष्ण मंगल कार्यालयात सर्वपक्षिय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादांच्या आठवणी जागवल्या. अतिशय शोकाकुल वातावरणात अजितदादांना उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार भिमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, उषाताई दराडे, संजय दौंड, राजेंद्र जगताप नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, सुशीलाताई मोराळे यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे नेते, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्व. अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सर्वपक्षिय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच अजित दादा पवार यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक भाषणात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर चव्हाण म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन काम करताना शिव– शाहु– फुले– आंबेडकर विचाराला कधी दादांनी बगल दिली नाही, त्यांचे अकाली जाणे सर्वांना वेदना देऊन गेले होते. बीडला बारामती करण्याचा निर्धार केला होता. त्यांनी तसा शब्द दिला होता. उमेदीच्या काळात एक सक्षम नेतृत्व हरपले आहे. सुनेत्राताई उपमुख्यमंत्री झाल्या आहेत तेव्हा एकजुटीने पुन्हा हा विकास पुढे घेवून जाऊ. दादांच्या स्वप्नातला हा बीड जिल्हा निर्माण करुया असे त्यांनी सांगितले.

# माजलगावात संत गुरु रविदास व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ फेब्रुवारी**



शहरामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव ०१ फेब्रुवारी रोजी वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव या ठिकानी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहरप्रमुख धनंजय सोळंके, आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे, विलास नेमाने, अविनाश जावळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, उमेश जेथलिया, हरिष यादव, पुरूषोत्तम करवा, अमर साळवे, बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, धनंजय माने, यांचेसह अनेक मान्यवरांनी अभिवादन केले. जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे सचिव तथा जयंती अध्यक्ष हरिभाऊ सवणे जयंतीचे मार्गदर्शक, आयोजक, निमंत्रक व सर्व जयंती कमिटीने परिश्रम घेतले.

# पूर्णवादी बँकेतर्फे अजित दादांना श्रद्धांजली अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ फेब्रुवारी**



दि २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथील विमान अपघातात महाराष्ट्राचे लोकप्रिय लोकनेते व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे दुर्दैवी निधन झाले. या अकाली निधनाने महाराष्ट्र एका सक्षम नेतृत्वाला मुकला आहे. दादांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात पूर्णवादी बँक सहभागी असून त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म. बीड च्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या दुःखद प्रसंगी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी व बँकेचे संचालक श्री चंद्रकांत सानप, डॉ. आनंद वैद्य, डॉ. विवेक पालवणकर, डॉ. सौ. सुरेखा देशमुख, डॉ. सुरेंद्र कलंत्री, इंजि. महादेव हुलजुते, श्री विश्वंभर थिगळे, श्री सुमुख गोविंदपूरकर, प्रा. ज्योतीश्वर भालेराव, सीए गोपाल कासट, सीए नितीन करमाळकर सोबतच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेश कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रल्हाद राजुरीकर, सरव्यवस्थापक श्री महेश पारगांवकर, उउज श्री अविनाश हिंगणीकर, प्रशासन विभागप्रमुख सुधीर जोशी, कर्ज अधिकारी श्री आत्माराम जगताप तसेच बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी श्रद्धांजली वाहिली.

# ना.पंकजा मुंडे यांचा जि.प.निवडणूक प्रचारार्थ झंझावाती दौरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ फेब्रुवारी**

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारक तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा उद्यापासून झंझावाती प्रचार दौरा सुरू होत आहे. उद्या २ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाच तर ३ फेब्रुवारीला रोजी लातूर जिल्ह्यात तीन व सोलापूर जिल्ह्यात दोन जाहीर सभा त्या घेणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये अधिकाधिक भाजपाचे उमेदवार निवडून आणण्याच्या दृष्टीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभांना ठिकठिकाणी प्रचंड मागणी आहे. त्या अनुषंगाने पक्षाच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रचार दौऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. ०२ फेब्रुवारी रोजी सकाळी विमानाने छत्रपती संभाजीनगर येथे जाणार असून तिथून दुपारी हेलिकॉप्टरने जिल्ह्यातील विविध जि.प. गटांमध्ये पंकजाताई मुंडे यांच्या जाहीर सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. २ फेब्रुवारी रोजी दुपारी १२. वा पिशोर ता. कन्नड, दुपारी ०१.३० वा घाटनांद्रा ता. सिल्लोड, दुपारी ०३ वा. चौका, दुपारी ०५ वा आडगाव बु. ता. फुलंब्री रात्रौ ०७ वा बजाज नगर वाळुज ता. छत्रपती संभाजीनगर तर ०३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा किनगाव ता. अहमदपूर जि.लातूर, दुपारी १२.३० वा कोळनूर ता.जळकोट, दुपारी ०१.३० वा जानवळ ता. चाकूर तर सायं. ४.३० वा मंद्रुप ता.जि. सोलापूर, संध्या ०६ वा कुंभारी ता.जि. सोलापूर याठिकाणी त्यांच्या सभा होणार आहेत अशी माहिती ना पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी प्रा. चंद्रकांत मुळे यांची नियुक्ती करण्यात आली असून आज त्यांनी आपला पदभार स्वीकारला.या प्रसंगी सत्कार करतांना स्थानिक अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, सुशील देशमुख, रवि उबाळे, अविनाश वाघीरकर

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात कॉपीमुक्त हिंगोली अभियान राबविणार– जिल्हाधिकारी

## दहावीचे ५४ तर बारावीचे ३९ परीक्षा केंद्रावर होणार परीक्षा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**

इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर परीक्षांची शुचिता, पारदर्शकता व विश्वासार्हता कायम राखण्यासाठी जिल्ह्यात 'कॉपीमुक्त हिंगोली' हे विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

या अभियानांतर्गत सर्व परीक्षा केंद्रांवर कठोर दक्षता उपाययोजना राबविण्यात येणार असून भरारी पथके, स्थिर पथके, केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यामार्फत प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. परीक्षा काळात कॉपीप्रकरणांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही निरीक्षण, कागदपत्रांची काटेकोर तपासणी तसेच गैरप्रकार आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेता परीक्षा प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडणे हे प्रशासनाचे प्राधान्य आहे. त्यासाठी शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग तसेच केंद्रस्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. पालक, शिक्षक व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून 'कॉपीमुक्त हिंगोली' अभियान यशस्वी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी माहिती देताना सांगितले की, इयत्ता दहावीची परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार असून जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रांवर १६ हजार ६८७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यापैकी ४ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. इयत्ता बारावीची परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार असून ३९ परीक्षा केंद्रांवर १५ हजार २४१ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यामध्ये ७ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. दहावीच्या ५४ व बारावीच्या ३९ अशा सर्व परीक्षा केंद्रांवर प्रत्येकी एक बैठे पथक नियुक्त करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# कळमनुरी मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**

कळमनुरी येथे समाज कल्याण विभागाच्यावतीने चालविल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहात वरिष्ठांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना निकृष्ट जेवणासह पिण्याचे पाणी इतर असुविधांना सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात वंचीत बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन सादर केले आहे.

कळमनुरी येथील मागासवर्गीय मुलांच्या वस्तीगृहात ५० विद्यार्थी राहतात. या ठिकाणी विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा मिळत नाहीत. यासंदर्भात विद्यार्थ्यांकडून वारंवार तक्रार केल्यानंतर देखील गृहपालांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची प्रचंड हेळसांड होत आहे. या वस्तीगृहात २५ ते ३० खोल्यापैकी केवळ तीन खोल्यांमध्येच पाणी येते. त्यातही छतावर असलेल्या पाण्याच्या टाक्या मागील काही महिन्यांपासून धुतलेल्या नसल्यामुळे घाण पाणी येत आहे. हेच पाणी विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी वापरावे लागत आहे. स्वच्छता गृहाची दुरावस्था झाली असून विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

वस्तीगृहात भोजन निकृष्ट दर्जाचे दिले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. भोजनातील भातात अळ्या निघत आहेत. तर वरणात किडे निघत आहेत. पोळ्या देखील कच्च्या दिल्या जात आहेत. कंत्राटदाराकडे तक्रार केल्यास तुम्ही जेवण कमी खा म्हणजे चांगले जेवण देता येईल असे सांगितले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.

यासंदर्भात विद्यार्थ्यांनी वंचीत बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष राजु कांबळे यांच्याकडे तक्रार केली. दि १ फेब्रुवारी रोजी कांबळे आणि पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली असता सर्वच गैरप्रकार पुढे आले. त्यानंतर दि २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची भेट घेत वसतीगृहातील गैरप्रकाराची माहीती देत निवेदन सादर केले आहे. यामध्ये वसतीगृहात असलेल्या गैरसोयींची चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांना सर्व सुविधा द्याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे आगमन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**



राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार तथा राज्याचे मुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दु:खद निधन झाल्याने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून त्यांच्या अस्थिकलशाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच चाहत्यांना दर्शन घेता यावे यासाठी जिल्ह्यात अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे आगमन झाले असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेण्यासाठी जिल्ह्यात दि २ फेब्रुवारी रोजी त्यांच्या अस्थिकलश दाखल झाला आहे. दि ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता हिंगोली येथून वसमतकडे अस्थिकलशाचे प्रयाण होणार आहे. सकाळी ९ वाजता आ. राजू नवघरे यांचे निवासस्थानी शास्त्री नगर येथे अस्थिकलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर ११.३० वाजता हयातनगर, ११.४५ वाजता आरळ, १२ वाजता हट्टा, १२.१५ वाजता जवळा बाजार, १२.३० वाजता नागेशवाडी, १२.४५ वाजता औंढा नागनाथ, १.१५ वाजता हिंगोली येथील गांधी चौक येथे अस्थिकलशाचे आगमन होणार आहे. दुपारी ४ वाजता नर्सी नामदेवकडे प्रयाण होणार असून तिथे कयाधू नदीमध्ये अस्थिकलशाचे विसर्जन होणार असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांनी दिली आहे.



**हिंगोली– येथील आदर्श महाविद्यालयात सोमवारी वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. या स्नेह संमेलनाचे उद्‌घाटन सचिव रामचंद्र कयाल यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष गणेश चौधरी, रमेशचंद्र मुंदडा, किशोर सोनी, प्राचार्य विलास आघाव, उपप्राचार्य नरेंद्र साहु आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### कुंडलीक निर्मले यांना जीवन गौरव पुरस्कार



हिंगोली– महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या हिंगोली जिल्हा शाखेच्या वतीने कुंडलिक निर्मले यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला असून ३ फेब्रुवारी रोजी नरसी नामदेव येथे सकाळी साडेदहा वाजता पेन्शनर्स असोसिएशनचे राज्य अध्यक्ष एन.डी. मारणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमामध्ये राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, खासदार नागेश पाटील आष्टीकर, निलेश लंके, आमदार तानाजी मुटकुळे, संतोष बांगर, राजू नवघरे, शिक्षक आमदार विक्रम काळे, पदवीधर आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर, गजानन घुगे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड आदीसह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रदान केला जाणार आहे. कुंडलिक निर्मले यांची सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील सेवा लक्षात घेता त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला. पतंजली योग समितीच्या भारत स्वाभिमान या आर्थिक विभागाचे ते राज्याचे सहप्रभारी असून विविध सामाजिक कार्यामध्ये सक्रिय असतात. त्यांच्या या निवडी बद्दल भारत स्वाभिमानचे राज्य प्रभारी दिनेश राठोड, पतंजलीचे राज्य प्रभारी अनिल अमृतवार यांच्यासह भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, पतंजली जिल्हा प्रभारी मनमथ गुमटे, किसान प्रभारी ज्ञानदेव गुट्टे, युवा प्रभारी राजकुमार टिळे, सहप्रभारी बालासाहेब हरण, अशोक पवार, कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व पतंजलीच्या साधकांनी त्यांच्या अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत आहेत.

### वसमत उपजिल्हा रूग्णालयात लवकरच डायलिसिस सेवा सुरू, रूग्णांसाठी नोंदणी

हिंगोली– वसमत शहर व तालुक्यातील डायलिसिस रुग्णांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी आहे. आतापर्यंत डायलिसिससाठी बाहेरगावी जाणाऱ्या रुग्णांसाठी वसमत उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस मशीन उपलब्ध झाली असून येत्या दोन ते चार दिवसांत डायलिसिस सेवा सुरू होणार आहे. वसमत शहर व तालुक्यातील जे रुग्ण सध्या डायलिसिससाठी परगावी जात आहेत, त्यांनी तात्काळ वसमत उपजिल्हा रुग्णालयात आपली नोंदणी करावी, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर काळे यांनी केले आहे. नोंदणीसाठी किंवा अधिक माहितीसाठी रुग्णांनी थेट रुग्णालयास भेट द्यावी अथवा वैद्यकीय अधीक्षक डॉ. गंगाधर काळे (मो. ९१७५५५०१४३) यांच्याशी संपर्क साधावा. या सुविधेमुळे रुग्णांचा वेळ, खर्च आणि प्रवासाचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार असून परिसरातील गरजू रुग्णांना याचा मोठा लाभ होणार आहे. आवश्यकता भासल्यास पत्रकार मोईन कादरी (मो. ९८५०४८७८०८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सुनील देवडा यांना आयकॉनीक लीडर अवार्ड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**

ई-प्लस तर्फे आयोजित को ऑप बँक्स टॉप १०० को ऑप. समितर्फे आयकॉनीक लीडर अवार्ड २०२५ चा पुरस्कार ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांना पुणे येथे दि ३१ जानेवारी रोजी प्रदान करण्यात आला आहे. यावेळी इंडीयन बँकेचे सीईओ गोपाल भगत यांचेहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे, कॉसमॉस बँकेचे मिलींद काळे, मुंबई फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, ज्ञानेश्वर मामडे, गजानन देशमुख, राजेश अग्रवाल, संजय देवड, सुधीर जालनापूरे, सुजीत कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल पिपल्स को ऑप बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी यांच्यासह संचालक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# उबाठा शिवसेनेचे तालुकाप्रमुख गणेश देशमुख यांचा भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्षामध्ये चार वर्षापासून तालुकाप्रमुख म्हणून गणेश देशमुख यांनी काम केले. मात्र काही दिवसापासून ते पक्षावर नाराज होते.त्यांनी चार महिन्यापूर्वी शिवसेना तालुकाप्रमुखाचा राजीनामा पक्षश्रेष्ठीकडे दिला. त्यानंतर ते शिवसेना पक्षावर नाराज होते .अखेर त्यांनी काल एक फेब्रुवारी रोजी परभणी मध्ये भाजप पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे.गणेश देशमुख यांनी भाजपमध्ये प्रवेश घेतल्याने औंढा तालुक्यामध्ये शिवसेना (ठाकरे गट) पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

शिवसेना (ठाकरे गट)पक्षाचे माजी तालुकाप्रमुख गणेश देशमुख यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टी पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांनी गणेश देशमुख यांच्या गळ्यात पक्षाचा रुमाल घातला व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.हा पक्षप्रवेश परभणी या ठिकाणी झाला. यावेळी भाजपा हिंगोली जिल्हा संपर्क मंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजी मंत्री सुरेश वडपुरकर, भाजपा हिंगोली जिल्हाध्यक्ष माजी आमदार गजाननराव घुगे ,भाजपा यांच्यासह भाजपा पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# जिल्हा हॉकी असोसिएशनच्यावतीने हॉकी स्पर्धेची हिंगोलीत जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**



जिल्हा हॉकी असोसिएशनच्या वतीने ऑल इंडिया गोल्डकप हॉकी टुर्नामेंट माजी हॉकी खेळाडू दयानंद एन. श्रीलेले यांच्या स्मरणार्थ दि.८ फेब्रुवारीपासून आयोजित करण्यात आले असून, या स्पर्धेची जय्यत तयारी असोसिएशनच्या वतीने करण्यात येत आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातील ४० संघ सहभागी होणार आहेत.

हिंगोली जिल्हा हॉकी असोसिएशनच्या वतीने देशभरातील ४० संघांना हॉकी स्पर्धे करीता निमंत्रित करण्यात आले आहे. या स्पर्धेची जय्यत तयारी करण्यात येत असून, जुन्या जिल्हा परिषदेच्या मैदानावर या स्पर्धा होणार असल्याने मैदान सपाटीकरण, दुरूस्ती, स्वच्छता व अन्य कामे करण्यात येत आहेत. स्पर्धेमध्ये देशभरातील संघ सहभागी होत असल्याने त्यांच्या निवास व अन्य सुविधा खेळाडूंना असोसिएशनच्या वतीने करण्यात येणार आहे. ही स्पर्धा दि. ८ फेब्रुवारी ते दि. १५ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आली असून, स्पर्धेला ऑल इंडिया गोल्ड कप हॉकी टुर्नामिंट असे नामांकन करण्यात आले आहे. या निमंत्रित स्पर्धांना महाराष्ट्र हॉकी असोसिएशनने मान्यता दिली आहे.

गेल्या १७ वर्षांपासून हिंगोली शहरात प्रसिद्ध असलेल्या या स्पर्धा खंडीत झाल्या होत्या. परंतु, आता पुन्हा जिल्हा हॉकी असोसिएशनने या स्पर्धा आयोजित केल्या आहेत. स्व.डेप्यूटी कमिशनर (मुंबई पोलिस) तथा हिंगोलीचे हॉकी खेळाडू दयानंद एन.श्रीलेले यांच्या स्मरणार्थ या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धा यशस्वीतेकरीता असोसिएशनचे अध्यक्ष ओम प्रकाश श्रीलेले यांच्यासह पदाधिकारी प्रकाश वाघमारे, अय्यूब पठाण, गोविंद निजलेवार, शैलेश मुदीराज, कल्याण देशमुख, ओम दुबे, अनिल मुदीराज, राजू लोहगावकर, अनंद भट्ट, केशव दुबे, संदीप मुदीराज, सचिन शर्मा, शेषराव कऱ्हाळे, ओम प्रकाश मुदीराज (अण्णा), सुभाष वाघमारे, विशाल मुदीराज परिश्रम घेत आहेत. या स्पर्धे करीता जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, लोकप्रतिनिधी व हॉकीप्रेमी सहकार्य करीत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या सेनगाव तालुक्यातील शाळांना भेटी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ फेब्रुवारी**

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सेनगाव तालुक्यातीलगोरेगाव येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला, आजेगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा तसेच जयपूर येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळेतील वर्गखोल्या, अध्यापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांचा अभ्यास घेऊन शैक्षणिक गुणवत्तेची तपासणी केली. यासोबतच शाळांमधील इतर आवश्यक सुविधांचीही पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशालेच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद साधला. शाळेच्या सध्याच्या परिस्थितीबाबत तसेच शैक्षणिक प्रगतीसंदर्भात यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महाशिवरात्री कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी पवार तर संयोजकपदी गायकवाड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०२ फेब्रुवारी :** येथील महाकालेश्वर प्रतिष्ठान, महाशिवरात्री उत्सव समिती, राजीव गांधी चौक, लातूर यांच्या वतीने 'महाशिवरात्री उत्सव २०२६'ची कार्यकारिणी रविवारी जाहीर करण्यात आली. प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या एकमताने पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

अध्यक्षपदी प्रतीक्षित पवार, संयोजकपदी अनंत गायकवाड यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून बलराज खंडूमलके, हंसराज जाधव यांची निवड केली आहे; तर स्वागताध्यक्षपदी अमर मानकरी, ओम धरणे, सचिवपदी मळगे, सहसचिवपदी दिनेश बोरा, कोषाध्यक्षपदी दिलीप मोरगे, प्रसिद्धीप्रमुख म्हणून महादेव पोलदासे, तर मिरवणूक प्रमुख म्हणून अनिल महाशिवरात्री उत्सव - २०२६ निमित्त महाकालेश्र्वर प्रतिष्ठान, लातूरच्या सदस्यांची बैठक झाली. बैठकीमध्ये अध्यक्ष, संयोजक, पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. जाधव, शरद मगर यांची निवड करण्यात आली. रोहित चवळे याप्रसंगी महाकालेश्र्वर प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष यांच्यासह संस्थेचे अनेक पदाधिकारी, माजी पदाधिकारी, मार्गदर्शक, सदस्य उपस्थित होते. ओम धरणे मित्रपरिवार, माता येडेश्र्वरी नवरात्र मंडळ, माता कुलस्वामिनी नवरात्र मंडळ, तुळजाभवानी गणेश मंडळासह लातूर शहरातील विविध मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी 'महाशिवरात्री उत्सव २०२६' हा यंदाही भव्य, भक्तिमय आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प सर्व पदाधिकारी, उपस्थितांकडून करण्यात आला.



## विविध वृत्त...

### 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम उत्साहात

**लातूर :** गोसावी समाज प्रतिष्ठाण, लातूर संलग्न महिला प्रतिष्ठाणच्या बचत गटाचा वर्धापन दिन सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या कौटुंबिक स्नेह मेळाव्यात हळदी-कुंकू कार्यक्रमासह महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' हा लोकप्रिय सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला होता.

या कार्यक्रमात विविध खेळांतील विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते पैठणी व आकर्षक भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. तसेच नव्याने निवडून आलेल्या नगरसेविका रागिणी यादव, प्रेरणा होनराव, नगरसेवक अँड अतिश चिकटे, पत्रकार अश्र्विनी धायगुडे, प्राचार्या डॉं. भागिरथी गिरी, बालाजी फड, रोहिणी गिरी यांचाही महिला प्रतिष्ठाणच्या वतीने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रीती पुरी यांनी केले. सूत्रसंचालन जयमाला पुरी व दिपाली गिरी यांनी केले. तर आभार प्रदर्शन पूजा गिरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मालती पुरी, अनुसया भारती, पल्लवी गिरी, उज्वला गिरी, मंजुला गिरी, पूजा पुरी, सरस्वती पुरी, अश्विणी पुरी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### प्रयागबाई पाटील महाविद्यालयात मेळावा

**लातूर :** येथील कै. प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालयात शनिवारी पालक सुसंवाद मेळावा उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य एकनाथ पाटील होते. प्रमुख पालक प्रतिनिधी गोपाळ नरवडे, विद्या गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. वर्षाराणी कांबळे यांनी केले. यावेळी कला विभाग प्रमुख प्रा. भगवान सुरकुटे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुरेंद्र खपाटे व विज्ञान विभाग प्रमुख प्रा. वर्षाराणी कांबळे यांनी आपापल्या विभागाची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. धनराज मस्के यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. झाकीर कादरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जाधव सतीश, प्रा. लवटे प्रसाद, प्रा. क्षीरसागर शिवानंद, प्रा. जाधव जीवन, प्रा. प्राची जाधव, प्रा. अजय मिरकले प्रा. तोडकर, प्रा. अमोल पाटील, प्रा. दीपक मुंडे, प्रा. मयुरी बिरादार, प्रा. महादेव बरुरे, वृषल ढेपे, दयानंद भारती, जवळगेकर, परमेश्र्वर लवटे आदींनी परिश्रम घेतले.

### अवैध गुटखा विक्रीवर एलसीबीची कारवाई

**लातूर :** लातूर शहर व परिसरात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री, साठवणूक व वाहतूक रोखण्यासाठी लातूर पोलीस दलाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विवेकानंद चौक पोलीस स्टेशन हद्दीत कारवाई करून अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीस रंगेहाथ पकडले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला नाईक चौक ते कंदील चौक रोडवर पांढऱ्या रंगाच्या ॲक्टिव्हा स्कूटी क्रमांक एपी २३ एजी ७७७० वर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्रीसाठी वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. सदर पथकाने स्कूटी थांबवून झडती घेतली असता, ॲक्टिव्हा गाडीच्या डिक्कीमध्ये व पाय ठेवण्याच्या जागी पांढऱ्या पोत्यामध्ये व निळ्या बॉक्समध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा मिळून आला. झडतीदरम्यान विमल पान मसाला, रजनीगंधा पान मसाला, तंबाखूजन्य पदार्थांचे विविध पुडे, असा ३६ हजारी ७०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. तसेच हा गुटखा वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली स्कूटी असा १ लाख ६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी शैलेश अंबादास पारसेवार (वय ५१ रा. ब्लॉक नं. १९, कनेरी रिंग रोड, साई सृष्टी रो हाऊस, देसाई नगर, लातूर) च्या विरोधात विवेकानंद चौक पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७४, २७५ व २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास विवेकानंद चौक पोलीस स्टेशन करीत आहे.

### आरटीईअंतर्गत २५ टक्के प्रवेशासाठी पालकांची धावपळ

**लातूर :** आरटीई अंतर्गत खाजगी इंग्लिश मेडीयम स्कूलला २५ टक्के मोफत प्रवेशासाठी पालकांची हल्ली धावपळ सुरू असून, पालक विद्यार्थ्यांचे जन्म दाखले, रहिवासी, निवासस्थानापासूनच्या अंतराचा अंदाज घेत असून, ही प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. यावर्षीही २५ टक्के मोफत प्रवेशाची प्रक्रिया मुदतीत करण्याच्या हालचाली शिक्षण विभागाने सुरू केल्या आहेत.

ज्या पालकाचे पाल्य वयाचे साडेपाच, सहा वर्ष पूर्ण करीत आहेत, अशा पालकांची कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी सध्या धावपळ सुरू असून, कागदपत्रांची जुळवाजुळव करून नंतर ऑनलाईन नोंदणी करावयाची आहे. नोंदणी झाल्यास प्रत्येक यादी तपासून आपल्या पाल्यास अपेक्षित इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश मिळतोय का? हे पाहायचे आहे. या सर्व प्रक्रियेत किमान महिना, दीडमहिना जाणार आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने पालकांना आरटीई अंतर्गत २५ टक्के मोफत प्रवेश घेण्याबाबत आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने, या प्रवेशाचीच सर्वत्र सुरू आहे. अजून तरी ऑनलाईन नोंदणी सुरूवात झालेली नाही. परंतु, लवकरच नोंदणी करण्याची परवानगी मिळणार आहे.

## विद्यार्थ्यांनी जागृत, तत्पर राहून आलेल्या संधीचे सोने करावे : डॉ. लहाने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०२ फेब्रुवारी :** शिक्षण ही आयुष्यातील खूप मोठी संधी आहे. शिक्षणाने क्रांती घडते व ती चिरकाल टिकते म्हणून जागृत रहा, तत्पर रहा, अलर्ट रहा, मस्त अभ्यास करा व आलेल्या संधीचे सोने करा, असे प्रतिपादन ख्यातनाम प्लास्टिक सर्जन तथा प्रेरणादायी वक्ते डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले.

श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त नुकत्याच संपन्न झालेल्या पारितोषिक वितरणाच्या दुसऱ्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर .हे होते. यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख, सहप्रमुख बालासाहेब करपुडे, विद्यार्थी प्रतिनिधी आदित्य गरड, विद्यार्थिनी प्रतिनिधी कौसुंबी पाटील यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात सांघिक पद्याने तसेच मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विठ्ठल लहाने यांनी आपल्या जीवनातील अनेक दाखले देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी आपला खडतर शैक्षणिक प्रवास सांगितला. संधी आपल्या जीवनात अनेक वेळा दार ठोठावते. आपल्याला त्या संधीचा उपयोग करून स्वतःचा विकास करता आला पाहिजे, असा संदेश याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. जीवनात कितीही प्रतिकूल परिस्थिती उद्‌भवली तरी विद्यार्थ्यांनी तिचा समर्थपणे सामना करून आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न करावा,असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात सुरेंद्र आलुरकर यांनी कुटुंब प्रबोधन, समरसता, स्वदेशी, पर्यावरण, नागरी कर्तव्ये या पंचपरिवर्तनाच्या प्रसारामध्ये सर्वांनी आपले योगदान द्यावे. विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करावा व जागृत राहून आपले ध्येय ठरवावे, असे आवाहन करून सर्व बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक याप्रसंगी त्यांनी केले.



यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यालयाचा गुणात्मक विकास स्पष्ट केला. विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी, सुप्त कलागुणांच्या विकासासाठी विद्यालयात घेतले जाणारे उपक्रम सांगून बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी चित्र प्रदर्शनीची पाहणी केली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शिक्षण विवेक अंकाच्या संकलित साहित्याचे प्रकाशन करण्यात आले. स्नेहसंमेलनानिमित्त विविध मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या स्पर्धेत आठवी ते दहावी विभागातील एकूण ३२० बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना आणि विजेत्या शिक्षकांनाही मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. बक्षिसांचे वाचन प्रल्हाद माले यांनी केले. विघ्नेश जोशी या विद्यार्थ्याने वैयक्तिक पद्य सादर केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन तेजस्विनी सांजेकर यांनी केले. शैला कुलकर्णी यांच्या कल्याणमंत्राने पारितोषिक वितरण समारंभाच्या दुसऱ्या सत्राची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी, रेनसिन्स सीबीएसई स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. मनोज शिरूरे, प्राचार्य महेश बांगर, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपूरकर, विद्यालयाचे पर्यवेक्षक, मोठ्या संख्येने उपस्थित असलेले पालक, सर्व शिक्षक, आठवी ते दहावी विभागातील विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

स्नेहसंमेलनानिमित्त संपन्न झालेल्या पारितोषिक वितरणाच्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, स्नेहसंमेलन प्रमुख तथा कार्यक्रम प्रमुख शैलजा देशमुख, सहप्रमुख बालासाहेब करपुडे, चित्रकला विभाग प्रमुख व्यंकटेश माने, शिक्षण विवेक प्रमुख कांचन तोडकर व स्मिता मेहकरकर, सर्व मंडळ प्रमुख तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## महापौर, उपमहापौर पदासाठी ५ फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज!

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०२ फेब्रुवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर आता सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या महापौर आणि उपमहापौर पदांच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार, सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहात नवनिर्वाचित सदस्यांची पहिली विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी काम पाहणार आहेत.

नगर विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार, लातूरच्या महापौरपदाचे आरक्षण अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी निश्र्चित करण्यात आले आहे. यामुळे पहिल्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी शहराला महिला महापौर मिळणार आहे. उपमहापौर पदासाठी मात्र कोणतेही आरक्षण लागू नसते.

निवडणूक प्रक्रियेसाठी नामनिर्देशन पत्रांचे (अर्ज) वाटप मंगळवार, ३ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. इच्छुक उमेदवारांना आपले अर्ज ५ फेब्रुवारीला सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत महानगरपालिका सचिवांकडे सादर करावे लागतील. अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. ज्यांच्याकडे वैधता प्रमाणपत्र नसेल, त्यांना समितीकडे अर्ज केल्याचा पुरावा आणि सहा महिन्यांत प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

९ फेब्रुवारीला होणाऱ्या विशेष सभेत पीठासीन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अर्जाची छाननी केली जाईल. त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत दिली जाईल आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे घोषित केली जातील. एकापेक्षा जास्त उमेदवार रिंगणात असल्यास, हात वर करून मतदान घेतले जाईल. मतदानाची संपूर्ण प्रक्रिया आणि सदस्यांची नावे इतिवृत्तात नोंदविली जाणार आहेत. या निवडीमुळे लातूर महापालिकेच्या नव्या कारभाऱ्यांचा मार्ग मोकळा होणार असून, राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे.

## 'कॉपीमुक्ती'ची घेतली शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०२ फेब्रुवारी :** लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात बारावीची परीक्षा कॉपीमुक्त व्हावी व त्यासंदर्भात जनजागृती व्हावी म्हणून १९ ते २६ जानेवारी यादरम्यान राबविल्या जात असलेल्या कॉफीमुक्त अभियानाच्या निमित्ताने कॉफीमुक्त व भयमुक्त परीक्षा देणार यासाठी विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. विजयकुमार मांदळे यांनी कॉपीमुक्त अभियानाच्या शपथेचे वाचन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी मी फेब्रुवारी, मार्चच्या परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी कोणत्याही गैरमार्गाचा विचारही करणार नाही. जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल, तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमाचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्र्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. माझे व माझ्या शाळेचे नाव उज्ज्वल करीन, अशी शपथ घेतली.

## समाज जागृती विद्यालयात विद्यार्थ्यांना निरोप
## इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०२ फेब्रुवारी :** समाज जागृती विद्यालय, मुरुड येथे दहावी व बारावी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना विद्यालयातर्फे निरोप देण्यात आला.

या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बी. एस. पटाडे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य चंद्रशेखर कळसे, सचिव ॲड. विजय पाटील, दिनकर मांडे, पत्रकार विजयानंद गायकवाड उपस्थित होते. प्रसंगी प्राचार्य कळसे म्हणाले, हे स्पर्धेचे युग आहे विद्यार्थ्यांनी संधी ओळखून आपल्यामध्ये बदल करून स्पर्धेच्या युगाबरोबर चालले पाहिजे. विद्यार्थ्यांचे कौतुक करणारी समाज जागृती शिक्षण संस्था एक खूप मोठे स्टेज आहे.

ज्या संस्थेतून आम्ही घडलो, त्याच संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा योग मला लाभला ही माझी खूप मोठे भाग्य आहे. पुस्तक वाचल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही त्यामुळे आपण मोबाईल गॅजेटचा वापर कमी करून जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करावे, विद्यार्थ्यांना आवाहन करत त्यांनी लगीन घाई या त्यांच्या गाजलेल्या कथेचे आपल्या अस्सल साहित्यिक शैली मधून सादरीकरण केले.

अध्यक्षीय समारोपात पटाडे म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करण्याचे व नेतृत्व गुण जोपासण्यासाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी कठोर मेहनत, नियमित अभ्यास करणे गरजेचे आहे. अभ्यासासोबतच आपल्या उपजत कलागुणांनाही वाव देणे तेवढेच महत्वाचे आहे. आजचे युग स्पर्धेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या प्रयत्नांना शिक्षक - पालक यांच्याकडूनही आवश्यक ते प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थी निश्र्चितच यासाचे अत्युच्च शिखर गाठू शकतात,असा विश्वासही बी. एस. पटाडे यांनी व्यक्त केला. यावेळी आरती पांचाळ, कांबळे दिव्या, ससाने रागिनी, नंदिनी गायकवाड, तिवारी वैशाली, भार्गवी जोशी, कोकणे अस्मिता, भडंगे दिव्या, घोडके समीक्षा, बोंदर ज्ञानेश्वरी, घोडके, श्रेया भिसे प्रांजली या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य एस. झेड. कदम यांनी केले. सूत्रसंचालन आर. एम. जोगदंड, मुळे डी. एन, जगताप एस. बी, पाटील ए. यांनी केले. आभार प्रदर्शन भन्साळी एम. आर. यांनी केले. या कार्यक्रमास शिक्षक व प्राध्यापक यांनी परिश्रम घेतले.

## अभिनेता ज्यु. जॉनी लिव्हर यांनी केली स्वीप कलापथकाच्या वतीने जनजागृती

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०२ फेब्रुवारी :**

अहमदपूर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर स्वीप (डतएएझ) कलापथकाच्या वतीने मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रसिद्ध विनोदी कलाकार ज्यु.जॉनी लिव्हर यांनी आपल्या खास शैलीतून नागरिकांना मतदनाचे महत्त्व पटवून दिले.




हास्य, संवाद आणि प्रभावी संदेशांच्या माध्यमातून त्यांनी मतदान हा प्रत्येकाचा अधिकार व कर्तव्य आहे असा स्पष्ट संदेश दिला.

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी स्वीप पथकाचा विशेष उपक्रम लोकशाही बळकट करण्याच्या उद्देशाने मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप पथकाद्वारे विशेष उपक्रम राबवला जात आहे.. या उपक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी कलापथक, पथनाट्य, घोषवाक्ये, पोस्टर-प्रदर्शन व प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला. विशेषतः पहिल्यांदा मतदान करणारे युवक, महिला व ग्रामीण भागातील मतदार यांना मतदानाचे महत्त्व पटवून देणे इत्यादी उपक्रम स्वीपच्या माध्यमातून होत आहे.

या अभियानांसाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे, अहमदपूरचे तहसीलदार उज्वला पांगरकर, गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे यांच्या आदेशानुसार अहमदपूर तालुक्यात स्वीप पथकाच्या माध्यमातून जनजागृती होत आहे.सदरील कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वीप पथक प्रमुख महादेव खळुरे,मोहन तेलंग,शिवकुमार गुळवे, प्रा. शिवशंकर पाटील, विवेकानंद मठपती, जयप्रकाश हराळे,सौ अर्चना माने, संतोष मुंडे,नागनाथ स्वामी हे सदस्य परिश्रम घेत आहेत. यावेळी डॉक्टर बालाजी कारामुंगीकर व रमेश भालेराव यांची उपस्थिती होती.

## श्री विश्वकर्मा प्रगट दिन व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०२ फेब्रुवारी :** येथील श्री विश्वकर्मा सेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री विश्र्वकर्मा प्रगट दिनाचे औचित्य साधून दि. २४ ते ३१ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आलेला अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण उत्साहात साजरा झाला. लातूर शहरापासून जवळच बिडवे इंजिनिअरिंग कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या श्री विश्वकर्मा नगरमधील मंदिरात हा सोहळा पार पडला.



या सप्ताह सोहळ्यात दररोज पहाटे श्री विश्वकर्मा महापूजा, पहाटे ५ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी २ ते ४ महिला भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री १० ते १२ जागर अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. त्याचप्रमाणे सप्ताहानिमित्त दररोज हभप. सर्वश्री नंदू महाराज हरंगुळकर, किशन महाराज सांडूरकर, सुधीर महाराज होळीकर, देविदास महाराज निवळीकर, राम महाराज पांचाळ, संजय महाराज खडकउमरगा, बापुदेव महाराज बेलगावकर यांची किर्तनसेवाही झाली. सप्ताहात हरीश्र्चंद्र पांचाळ, ज्योतीराम पांचाळ, वीरनाथ पांचाळ, सूर्यकांत पांचाळ, शिवलिंग विभुते, गणपत गाडेकर, संजय पांचाळ, कौस्तुभ देविदास सुवर्णकार यांच्यासह अनेकांनी अन्नदानाची सेवा दिली.

या सप्ताह सोहळ्याची सांगता शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी हभप. गुरुराज महाराज देगलूरकर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली.

या सोहळ्यासाठी ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, पांचाळ, सचिन पांचाळ, भीमाशंकर झुंजारे, संतोष शेळके, चंद्रकांत खटके, प्रभू राठोड, मोहनराव पांचाळ, नवनाथ पांचाळ, विजय सहदेव, भागवत पांचाळ, बालाजी पांचाळ, गणपत गाडेकर, नारायणराव कुमठेकर, बळवंत पांचाळ, देवेंद्र पांचाळ, पंकज सुतार, दत्तात्रय पोतदार, अशोक पांचाळ, विश्र्वनाथराव पांचाळ, जयहिंद पांचाळ, प्रा. डॉ. बाळासाहेब नन्नवरे, सूर्यकांत पांचाळ, दत्तात्रय सुतार, सोपान आलमलेकर, एड. धर्मराज सुतार, गोविंदराव पांचाळ, वसंतराव अपसिंगेकर, बाबुराव पांचाळ, डी.पी. पांचाळ, राजकुमार पांचाळ, कौस्तुभ सुवर्णकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री विश्र्वकर्मा सेवा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष हरीश्चंद्र पांचाळ, उपाध्यक्ष विठ्ठल पांचाळ, सचिव नामदेव पांचाळ यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अजितदादांचा अस्थीकलश दर्शनासाठी नांदेडमध्ये दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ फेब्रूवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे दिवंगत लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे आज दुपारी नांदेडमध्ये आगमन झाले आहे.

दि ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी अजितदादांच्या अस्थी कलशाचे दर्शन घेण्यासाठी दुपारी ४.०० वाजल्यापासून आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंतनगर, नांदेड येथील जनसंपर्क कार्यालयात ठेवण्यात आला आहे.

या अस्थीकलशाचे माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष सौ.मीनलताई पाटील खतगावकर, उमरी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक कैलास देशमुख गोरठेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष सुरजीतसिंघ गिल, नेताजीराव भोसले आदींनी दर्शन घेतले.

उद्या मंगळवार, दि.३ फेब्रुवारी रोजी सकाळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे संपर्क कार्यालय, वसंतनगर, नांदेड येथून असती कलश यात्रा सकाळी ८.०० वाजता निघणार आहे. अजितदादांवर प्रेम करणाऱ्या सर्व जनतेने अस्थिकलशाचे दर्शन घ्यावे,असे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाग्यनगर पोलीसांनी केले ७१ हजारांचे मोबाईल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ फेब्रूवारी-**

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने छत्रपती चौकातून एका आरोपीस अटक करुन त्याच्याकडून ७१ हजार रुपयांचे आठ मोबाईल जप्त केले आहेत. सदरची घटना काल सायंकाळी उघडकीस आली.

नागेश उर्फ लड्या उत्तमराव लडे (२५) रा.मेंढला खु. ता.अर्धापूर असे या आरोपीचे नाव आहे. पोलीस निरीक्षक संतोष तांबे व गुन्हे शोध पथकाचे महेश माळी यांना मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार छत्रपती चौक नांदेड येथे भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक व्यक्ती थांबला असून



त्याच्या संशयास्पद हालचाली सुरु आहेत. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोलीस निरीक्षक महेश माळी व त्यांच्या पथकाने लगेच त्याठिकाणी धाव घेतली व आरोपीची विचारपूस केली. तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याच्याजवळ वेगवेगळ्या कंपनीचे आठ मोबाईल मिळून आली.सदरच्या मोबाईलची कागदपत्रे विचारली असता त्याने उडावाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी सखोल पाहणी करुन यातील दोन मोबाईल भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले. आरोपीची झडती घेतली व त्याच्याकडून सदरचे आठ मोबाईल जप्त केले आहेत. त्याची किंमत ७१ हजार रुपये एवढी आहे. नागेश लडे यास अटक केली असून, त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## गवळी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी अडवणूक, महसूलमंत्र्यांकडे तक्रार

**नांदेड -** कागदपत्राची पूर्तता करुनही गवळी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी अडवणूक होत असून, प्रमाणपत्राचे संबंधितांना आदेशित करावे, अशी मागणी महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तुलजाराम यादव व उपाध्यक्ष कुवरचंद मंडले यांनी एका निवेदनाव्दारे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये गवळी समाजाला जातीच्या प्रमाणपत्रासाठी उपविभागीय अधिकारी व अन्य अधिकारी जाणिवपूर्वक अडवणूक करत आहेत. यामुळे गवळी समाजातील मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. अनेकवेळा निवेदने देवून देखील प्रमाणपत्र देण्यात येत नसून, जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांना गवळी (एनटीबी-३६) या जातीचे प्रमाणपत्र देण्याचे आदेशित करावे, असे निवेदनात नमुद करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे राज यादव यांची उपस्थिती होती.

## मुगट जिल्हा परिषद शाळेमध्ये माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**मुदखेड -** दि.१ फेब्रुवारी रोजी मुदखेड तालुक्यातील मुगट येथील जिल्हा परिषद शाळेत सकाळी ११ वाजता माजी विद्यार्थी व माजी शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी गजानन जोशी (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक),प्रमुख पाहुणे म्हणून देविदास पवार (माजी मनपा आयुक्त )हे होते. हा मिळावा शाळेतील सण १९६५ ते २०१५ या कालावधीतील शालेय शिक्षण



घेतलेल्या माजी विद्यार्थी तसेच माजी शिक्षकांसाठी शाळेकडून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मुंगरे यांनी सुरुवातीला केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. शाळेत तत्कालीन मुख्याध्यापक, शिक्षक म्हणून कार्य केलेल्या उपस्थित सर्वांचा शाल व पुष्प देऊन माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जवळपास शाळेतील २५ माजी मुख्याध्यापक ,माजी शिक्षक यांनी या मेळाव्यासाठी आवर्जून उपस्थिती लावली होती. माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने मुंबई, पुणे, छ.संभाजीनगर येथून माजी विद्यार्थी व शिक्षक आले होते. या शाळेचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत तर अनेक जण मोठ्या पदावर विराजमान होऊन सेवानिवृत्त झाले आहेत. या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने शाळेतील माजी शिक्षकांनी आपले मनोगत मांडले व शालेय जीवनातील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला त्यात एस. के. पचलिंग सर, बी.टी पाटील सर, नारायण कुलकर्णी सर, चंडीदास देशपांडे सर, पी एम.पेंटेवाड सर, आदींनी आपले मनोगत यावेळी मांडले. माजी विद्यार्थी यांनी सुध्दा शालेय जीवनातील आपल्या जुन्या आठवणींना याप्रसंगी उजाळा दिला. या प्रसंगी माझी विद्यार्थी यांच्याकडून शाळेला एक प्रिंटर, १५ पांढरे फळे या वस्तू भेट दिल्या सर्वात शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी हा एक चांगला उपक्रम हाती घेतला आहे. दरवर्षी आपण हा उपक्रम अशाच पद्धतीने राबवावा असं मनोगत यावेळी त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचाल ज्ञानेश्वर मरकंटे (शिक्षक) आशिष कल्याणे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचारी ,माजी विद्यार्थी, शालेय समिती यांनी परिश्रम घेतले. मुगट जिल्हा परिषद शाळेत प्रथमच हा माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात शाळेमध्ये माजी विद्यार्थी माजी शिक्षक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा नवीनच उपक्रम शाळेमध्ये प्रथमच राबवला त्यामुळे शाळेतील या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## होलीसिटीची कु.मीमांसा पाडमुख निबंध स्पर्धेत प्रथम

**नांदेड-** सातत्याने वर्गात क्रमवारी कायम राखत विविध सांस्कृतिक, स्पर्धात्मक परिक्षा आणि वेगवेगळ्या स्पर्धेत यश मिळविणाऱ्या कु. मीमांसा रुपेश पाडमुखने निबंध स्पर्धत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल



प्रिन्सिपल मो. अर्शद सर यांच्यासह सर्व शिक्षक व संचालकांनी अभिनंदन केले आहे. नांदेड शहरालगत असलेल्या पासदगांव येथे असलेल्या होलीसिटी पब्लीक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणासह स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी वेगवेगळ्या परीक्षा व स्पर्धा घेवून प्रोत्साहन दिल्या जाते. भारतीय राज्य घटनेवर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत होलीसिटीची मीमांसा पाडमुखने सहभाग घेवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेतील यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे प्रिन्सिपॉल मो. अर्शद, उपप्राचार्य सुजाता नाईक, बाळासाहेब पवार, सौ. रश्मी यंदे, सौ. रिना साले, राजेश जामगे, सुनिल पाटील, अर्पिता कुलकर्णी आदींसह इतरांनी त्यांचे अभिनंदन केले. शाळेत संस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर बंडेवार, सचिव बालाजी उत्तरवार, कोषाध्यक्ष नरेश सोमावार, कार्यकारी समितीचे अध्यक्ष काळे यांच्या हस्ते प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. मीमांसा पाडमुखचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहसचिव विनायक पारसेवार, येरावार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या यशाबद्दल मीमांसाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# विवाहितेचा खून करून आत्महत्येचा बनाव



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ फेब्रूवारी-**

ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील न्याय नगर येथे विवाहित महिलेला सासरच्या मंडळींनी होण्यासाठी छळ करून खून केला आहे. यातील सासरच्या आरोपी मंडळींना तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी बुरुड समाज संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना निवेदनाद्वारे केली आहे.

बुरुड समाजातील तृप्तीचा विवाह न्यायनगर येथील रहिवासी हेमंत चर्लेवार यांच्याशी पाच वर्षांपूर्वी रीतीरीवाजाप्रमाणे झाला होता. तृप्तीच्या घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचे माहीत असून देखील हूंड्याची मागणी करण्यात येत होती. हुंडा मिळत नसल्याने विवाहितेचा पती हेमंत चर्लेवार, श्रावण वासमवार, कुसुम चर्लेवार, रोहित चर्लवार, रेणुका नागेश्वर, चंचल पदमगिरवार व उमाकांत वासमवार यांच्याकडून शारीरिक व मानसिक त्रास दिला जात होता. विवाहिता त्रपती चरलेवार दोन मुलांच्या तोंडाकडे बघून सर्व काही सहन करीत होती. विवाहितेच्या माहेरकडून वारंवार समजून काढून देखील हुंड्याच्या मागणीसाठी छ्ळ थांबविला जात नव्हता. सासरच्या मंडळींनी संगणमत करून दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी तृप्तीचा जबर मारहाण करून खून केला आणि आत्महत्या केल्याचा बनाव केला. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाणे येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे परंतु आरोपींना अटक केली नाही त्यामुळे तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बुरुड समाज संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना केली आहे

या निवेदनावर,नागू सूनेवार, गंगाधर राहेरकर, मोहन पटकुटवार, शाहू वासमवार, संतोष सुनेवार, शेषेराव पटकुटवार, सदाशिव नागेश्वर, मुकुंद वासमवार, डॉ राजू नागेश्वर, कैलाश सूनेवार, दीपक नागेश्वर, बाबूराव नागेश्वर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत

# जिल्हा व सत्र न्यायालयासाठी मूलभूत सुविधांबाबत किनवट वकील संघाची नगराध्यक्षासोबत चर्चा

**तभा वृतसेवा**
**किनवट,दि. २ फेब्रूवारी-**

किनवट येथे मंजूर झालेल्या व सध्या निर्माणाधीन असलेल्या जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीच्या ठिकाणी आवश्यक त्या मूलभूत व नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने किनवट वकील संघाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर नवनियुक्त नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांचा वकील संघाच्या वतीने सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्या संदर्भात किनवट वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषद कार्यालयात नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या चर्चेदरम्यान जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीभोवती रस्ते, पिण्याच्या पाण्याची सुविधा, वीजपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, ड्रेनेज, पार्किंग सुविधा तसेच न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या इतर नागरी सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे असल्याचे वकील संघाच्या वतीने नमूद करण्यात आले. न्यायालय सुरू झाल्यानंतर न्यायाधीश, वकील, कर्मचारी



तसेच न्यायासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागू नये, यासाठी नगर परिषद व प्रशासनाने समन्वयाने काम करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी वकील संघाच्या सूचनांचे स्वागत करत, जिल्हा व सत्र न्यायालय हे किनवट शहरासाठी अत्यंत महत्त्वाचे शासकीय केंद्र ठरणार असल्याचे सांगितले. न्यायालय परिसरात आवश्यक त्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषद आपल्या स्तरावरून पूर्ण सहकार्य करेल, तसेच संबंधित विभागांशी समन्वय साधून कामे मार्गी लावली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

या भेटीप्रसंगी युवा नेते करण येंड्रलवार, नगरसेवक अभय महाजन, शहर प्रमुख प्रशांत कोरडे यांच्यासह किनवट वकील संघाचे अध्यक्ष ॲड. किशोर मुनेश्वर, उपाध्यक्ष ॲड. टेकसिंग चव्हाण, तसेच ॲड. अरविंद चव्हाण, ॲड. उदय चव्हाण, ॲड. आकाश कोमरवार, ॲड. पंकज गावंडे, ॲड. येऊतकर, ॲड. सम्राट सर्पे, ॲड. मिलिंद सर्पे,ॲड. दिव्या पाटील, ॲड. दीपा सोनकांबळे, ॲड. विपीन पवार, ॲड. मुसळे, ॲड. व्ही. बी. कानिंदे, ॲड. सचिन दारवंडे, ॲड. हरि दर्शनवाड आदी वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही चर्चा सकारात्मक वातावरणात पार पडली असून, आगामी काळात न्यायालयीन सुविधा आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीने हे सहकार्य उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा चुडावा येथील रोखपाल परस्पर खातेदारांचे विड्रॉल उचलून फरार

**तभा वृतसेवा**
**चुडावा, दि. २ फेब्रूवारी-**

पूर्णा तालुक्यातील चुडावा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा चुडावा येथे कॅशियर यांनी केला परस्पर खातेदारांचे विड्रॉल उचलून अपहार याप्रकरणी निलंबित केल्याची माहिती समोर

चुडावा जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा चुडावा येथील रोखपाल साखरे यांनी अंदाजीत सहा दिवसापूर्वी बँक खातेदारांनी एक लाख रुपयांच्या वर तर कोणी एक लाख रुपयांच्या आत अशी विड्रॉल पास करण्यासाठी दिले तर कॅश नाही थोड्यावेळाने देतो अशी खातेदारांना सांगण्यात आले त्यानंतर दुसऱ्या दिवशी खातेदार यांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता तुमची रक्कम मी उचलली आणि मला अडचण आहे मी तुमची रक्कम उद्या पाठवून देतो असे म्हणून खातेदाराची रक्कम उचलून घेऊन कॅशियर पसार झाला बँक येथे संपर्क साधला असता आमच्या संपर्कामध्ये येतो पण फोन घेत नाही असे बँक कर्मचारी यांनी माहिती दिली यावर सदरील मध्यवर्ती बँक संचालक नंदकुमार डाखोरे यांना संपर्क साधला असता आम्ही त्याला निलंबित केले असल्याची कारवाई करून त्याला निलंबित केली असल्याची माहिती संचालक यांनी दिली सदरील घटनेची काही खातेदारांना चर्च केली असता आमची रक्कम न मिळाल्यास आम्ही त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करू अशी सांगण्यात आले.

# नीती धर्माने आचरण करणाऱ्या व्यक्तीलाच समाजात प्रतिष्ठा : ह.भ.प. नारायण महाराज

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २ फेब्रूवारी-**

श्री गुरुचरित्र पारायण सोहळ्यानिमित्त मौजे घोगरवाडी तालुका किनवट या तेलंगणा व महाराष्ट्र राज्यांच्या सीमेवर असलेल्या अतिदुर्गम अशा गावात आदरणीय महाराजांचे सत्संग प्रवचन कार्यक्रम संपन्न झाला त्याप्रसंगी महाराजांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजामध्ये वावरताना पैशापेक्षाही नीती व धर्माने आचरण केले तरच समाजात प्रतिष्ठा इज्जत राहते त्याप्रसंगी दृष्टांत देताना महाराजांनी जंगुबाईचे उदाहरण दिले जंगुबाईकडे कुठलीही संपत्ती,वैभव नव्हते पण त्या नीती व धर्माने आचरण करत असल्यामुळेच आज समाजात गावोगावी त्यांची मंदिरे आहेत फोटो आहेत समाज त्यांची पूजा करतो त्यांना वंदन करतो. आज समाजामध्ये आपल्या निजधर्मापासून आपल्याला दूर करणाऱ्या बाहेर काढणाऱ्या शक्ती आपल्या सभोवताली कार्यान्वित आहेत आणि म्हणूनच आपले चारित्र्य आणि आपला धर्म आज सुरक्षित ठेवणे ही काळाची गरज आहे. आपण चांगले आचरण करू लागलो तर वाईट आचरण करणाऱ्याला अडचण निर्माण होते म्हणून ते आपल्याला काहीतरी अमिष किंवा लालूच दाखवून आपला धर्म भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतात. जो नीतीने आचरण करणार नाही त्याचे निश्चितच पतन झाल्याशिवाय राहत नाही.

## नारायण भुसावळे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २ फेब्रूवारी-**

शंकरनगर,ता.बिलोली येथील कै.मधुकरराव पाटील महाविद्यालयातील कर्मचारी व आदमपूर येथील रहिवासी नारायण संभाजी भुसावळे यांचे सोमवार दि.

दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी नांदेड येथील रूग्णालयात दुखःद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर त्याच रोजी दुपारी २ वाजता धुप्पा-शंकरनगर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, सून, नातवंडे, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

# मुलांना आवडीनुसार करिअर करु द्यावे : मिनगीरे

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २ फेब्रूवारी-**

आपल्या मुलांना आवडीनुसार करिअर सुरु करावे असे समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी विश्वकर्मा जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार शिवाजी पांचाळ तर प्रमुख अतिथी म्हणून नांदेडचे सहाय्यक समाज कल्याण आयुक्त -शिवानंद मिनगिरे यांची उपस्थिती होती.भगवान

विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी करीत असताना अनेक मान्यवरानी प्रतेमेला पुष्पहार अर्पण केले यावेळी माजी आ रोहिदास



चव्हाण,प्रा मनोहर धोंडे, नगराध्यक्ष शरद पाटील पवार,माजी सभापती संजय क-हाळे , भिमराव पाटील शिंदे,राम पाटील पवार म.रा. वि.महावितरणचे उपकार्यकारी अभियंता नामदेवराव सुतार, भाजपा पंचायत राज आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष माधव पांचाळ, पांगरीचे माजी सरपंच सुदाम पाटील बुद्रुक, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, माजी नगरसेवक उत्तम महाबळे, माजी नगरसेवक चंद्रकांत नळगे, नगरसेवक.राजू बोडके,जयंती मंडळाचे केशव पांचाळ, विनोद पांचाळ,रमेश पांचाळ कारागिर,बालाजी पांचाळ, रामवाडीचे पोलिस पाटील वैजनाथ पांचाळ रायवाडीकर, विठ्ठल सुर्यवंशी , देवानंद पांचाळ, साईनाथ पांचाळ, स्वप्नीव पांचाळ, विरेंद्र पांचाळ, दिलीप पांचाळ,संतोष पांचाळ, सुरेश पांचाळ,रामानंद रामेज्वार, माधव पांचाळ अंतेश्वरकर, हनमंत पांचाळ, भगवान पांचाळ,राम पांचाळ, विठ्ठल पांचाळ,सोपान पांचाळ, बाबुराव पोतदार, श्रीरंग पांचाळ,सुधीर भाऊ आंबेकर, किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

# डॉ. कत्तुरवार यांच्या मार्गदर्शनाखाली दहा विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २ फेब्रूवारी-**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १० विद्यार्थ्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे.



महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागात पदवी,पद्व्युतर व पीएच.डी. पदवीसाठी विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संशोधन केंद्र कार्यान्वित असून यात लोकप्रशासन विषयात अध्ययन, अध्यापन, लेखन व संशोधन करण्याची सुविधा उपलब्ध आहे. डॉ. बी. आर. कतुरवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कांबळे नागेंद्र यांनी एड्स जनजागृतीमध्ये आरोग्य प्रशासनाची भूमिका :समस्या व उपाय, डॉ. सूर्यवंशी गोविंद मोतीराम यांनी पोलीस जनता व प्रसार माध्यम यांच्यातील संबंध नांदेड जिल्हा एक अभ्यास, डॉ. तिरकमटे निवृती गोविंदराव यांनी महाराष्ट्र शासनाचे जलयुक्त शिवार अभियान : एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ लातूर जिल्हा तसेच डॉ. जाधव महादेव उत्तमराव यांनी ग्रामीण विकास प्रशासन व ग्राम विकास निधी एक चिकित्सक अभ्यास: विशेष संदर्भ लातूर जिल्हा आणि डॉ. देशमुख दिग्विजय व्यंकटराव यांनी अवर्षणात प्रशासन व नागरिकांची भमिका : विशेष संदर्भ मराठवाडा या विषयावर संशोधन करून विद्यापीठात शोधप्रबंध सादर केले होते. तसेच

डॉ. कोपोल्लू सादीप्ती हरिबाबू यांनी The Interlink Between Good Governance and Public Policy : With Special Reference to Hyderabad District या महत्वपूर्ण विषयावर संशोधन कार्य पूर्ण केलेले आहे. तसेच डॉ. कोकंकटवार बालाजी यांनी आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासात लोकप्रशासनाची भूमिका, डॉ. लखपत्रेवार सुभाष गणपतराव यांनी शिवकालीन प्रशासन - एक अभ्यास डॉ. जोगदंड बबन पंडितराव यांनी महाराष्ट्राच्या लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदान एक अभ्यास तसेच स्नेहल संतोषराव कुलकर्णी यांनी ग्रामीण विकास प्रशासनातील महिला अधिकारी व कर्मचारी यांची भूमिका : समस्या व उपाय (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले आहे. सध्या लोकप्रशासन संशोधन केंद्रात डॉ.बी.आर. कतुरवार,डॉ.संजय देबडे, डॉ.दिलीप बंजारा व डॉ. गौरव जेवळीकर या चार संशोधन मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. लोकप्रशासन संशोधन केंद्राच्या या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य सूर्यकांत नारलावार, देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ एम एम चमकुडे उपप्राचार्य डॉ व्ही जी शेरीकर , पर्यवेक्षक संग्राम पाटील व कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.